# शेतकरी संघटक

वर्ष १२ वे
अंक ९ वा
२१ सप्टेंबर १९९५
पाक्षिक
वार्षिक वर्गणी रु. ३०
किंमत १ रुपया २५ पैसे


# ‘सक्षमीकृत’ मुखंडींचा बेजिंगी उरुस

– शरद जोशी

**बेजिंग परिषदेचे सूप वाजले**

आंतरराष्ट्रीय महिलांची सरकारी परिषद बेजिंग येथे पुरी दोन आठवडे चालली. गेल्या शुक्रवारी, म्हणजे १५ सप्टेंबर रोजी तिचे सूप वाजले. देशादेशातून आलेल्या सरकारी आणि बिनसरकारी महिला प्रतिनिधी घराच्या दिशेने निघाल्या; सधन तेवढ्या वाटेवर हाँगकाँग, कंबोडिया, थायलंड, जपान अशा देशांच्या धावत्या भेटी परतीच्या वाटेवर साधत आहेत. बाकीच्या घरी येऊन पोचल्या.

१८० राष्ट्रांच्या प्रचंड परिषदेस भारतातून गेलेल्या एकूण स्त्रियांची संख्या तीनशेच्यावर. बिगर सरकारी महिला परिषद बेजिंगच्या वेशीबाहेर लांब भरवली होती. तिलाच गैरसरकारी संघटनांच्या ३० हजार प्रतिनिधी उपस्थित होत्या. स्त्रियांचा एवढा मोठा जमाव पाहून पुष्कळशा प्रतिनिधी बावरल्या असणार. पाचपन्नास स्त्रियांच्या समोर बोलण्याची सवय; एकदम एवढ्या जमावासमोर बोलणे मोठे कठीण!

संयुक्त राष्ट्र संघातर्फे भरवलेली परिषद म्हणजे अतिमहत्त्वाच्या व्यक्तींचा दबदबा असायचाच. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांच्या पत्नी आल्या. चीनमधील मानवी हक्कांच्या अभावासंबंधी त्यांनी शब्दांची आतषबाजी केली. पाकिस्तानच्या बेनझीर भुत्तो यांनी ‘मी पंतप्रधान म्हणून आले नाही; एक कन्या, पत्नी आणि माता म्हणून आले आहे’ असे सुरुवातीचे टाळीचे वाक्य टाकले आणि नंतर त्या काश्मीर प्रश्नावर घसरल्या. श्रीलंकेच्या चंद्रिका आणि बांगला देशच्या खालिदा झिया घरच्या अडचणीत गुंतलेल्या असल्यामुळे उपस्थित राहू शकल्या नसाव्यात. भारतासारख्या देशाच्या प्रतिनिधींचे नेतृत्व सांभाळण्यास कोणी समर्थ स्त्री सापडली नाही. सोनिया गांधींनी नकार दिला असावा, तेव्हा ते काम माधवराव शिंद्यांकडे आले. जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या नऊ देशांच्या शैक्षणिक समस्यांबद्दल ‘बाली’ येथील परिषद बेजिंग परिषदेच्या मागोमाग भरायची होती. माधवराव शिंद्यांनी बाली परिषदेसही जायचे ठरले होते, तिकीटांची बचत एवढेच फार तर माधवरावांच्या नेमणुकीचे समर्थन असू शकते.

देशोदेशीच्या स्त्रिया इतक्या मोठ्या संख्येने जागतिक परिषदेस गेल्या त्याचा एक चांगला परिणाम आहेच. बाहेरचे वारे न लागलेल्या या कार्यकर्त्यांची थोडी भीड चेपली असणार, थोडी धिटाई आली असणार, आत्मविश्वास वाढला असणार. येत्या पाचदहा वर्षांत महिला चळवळीच्या कामात या कार्यकर्त्यांना महत्त्वाची भूमिका बजावता येईल. याउलट त्यांतील कार्यकर्त्या काही अनुभवाचा फायदा घेण्याऐवजी बेजिंगचे वारे कानांत शिरल्याप्रमाणे वागू लागतील, ‘आम्हा बेजिंग रिटर्न कार्यकर्त्यांचे बाकीच्या साध्या कार्यकर्त्यांनी बिनबोभाट विनातक्रार ऐकले पाहिजे.’ अशी अपेक्षा ठेवतील तर त्यांचा स्त्री-चळवळीस मोठाच उपद्रव होण्याचा धोका आहे.

**स्त्री-चळवळीची दशा आणि दिशा**

पण पाचदहा कार्यकर्त्या जरी खऱ्या अर्थाने कामाला लागल्या तरी त्याचा मोठा लाभ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. एकट्या पुणे शहरात शंभरावर स्त्री संघटना आहेत. कोणा बाईस टाकले, कोणाला मारहाण होते, कोणास पोटगी मिळत नाही, कोणी जिवाला कंटाळून मरण पत्करते, कोणाचा सासरच्यांनी जीव घेतला असल्या तक्रारी नोंदवणे आणि दमछाक होईपर्यंत त्यांचा पाठपुरावा करणे हे त्यांचे महत्त्वाचे काम. सरकारशी लागू झालेल्या संघटनांना भरपूर निधी मिळतात. त्यातून परिसंवाद, शिबिरे भरवावीत किंवा अतीच झाले तर लोणच्यापापडांचे उद्योग काढून दुर्दैवी स्त्रियांना रोजगार किंवा काही आसरा पुरवल्याची शेखी मिरवावी असे साधारणपणे स्त्री संघटनांचे काम आहे. मुंबई-दिल्लीसारख्या शहरांत स्त्रीचळवळीचे स्वरूप थोडे वेगळे आहे. स्त्रियांचा प्रश्न काय? या विषयावर गेल्या पन्नास वर्षांत प्रचंड साहित्य तयार झाले आहे. स्त्रियांचे सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, लैंगिक इ. इ. इ. शोषण, पुरुषप्रधान व्यवस्थेची दुष्टता इत्यादि विषयांवर विपुल अभ्यास होतात. काही सैद्धान्तिक मांडणीही होते. सर्वसाधारणपणे समांतर विषयांवर पुरुषांनी केलेल्या लिखाणापेक्षा स्त्रियांनी केलेले लिखाण, म्हटले तर काकणभर सरसच आहे. स्त्रीविषयक साहित्याचे आणि

अभ्यासांचे 'स्पेशालिस्ट' मोठ्या शहरातील महाविद्यालये आणि विद्यापीठे यांच्या आसमंतात उदंड झाले आहेत. काही काळ्यावर पांढरे करावे, तेवढ्याच्या आधाराने आंतरराष्ट्रीय परिषदा आणि परिसंवाद यांची निमंत्रणे मिळवून वर्षातून निदान एखाद दुसरी फेरी तरी परदेशी करावी, उरल्या वेळांत देशी परिसंवाद गाजवावेत असा त्यांचा कार्यक्रम!

या सगळ्या धावपळी बहुतांशी प्रामाणिकपणे कळकळीने होतात. व्यक्तिगत शोकांतिकांच्या प्रकरणी उत्साहाच्या भरांत काही सज्जन माणसेही स्त्री संघटनांच्या रोषास बळी पडतात; तर काही प्रकरणी प्रकरण धसास लावण्याचे एकदम का थंडावले याबद्दल काही संशय निर्माण व्हावा अशीही परिस्थिती असते. तरीही या सर्वांच्या कामगिरीमुळे स्त्रीप्रश्नाची सार्वजनिक जाणीव वाढली. आता या प्रश्नाचा उपहास करणारे नरपुंगव थोडेच उरले आहेत. काही महिला मुखंडांना अधिकाराच्या जागा मिळाल्या, पोलिसचौकीत विचारपूस करण्यासाठी गेल्यावर काही जणींना आदराने बसण्यासाठी खुर्ची पुढे केली जाते हे सोडल्यास सर्वसाधारण स्त्रियांच्या कुटुंबातील, समाजातील परिस्थितीत कोठे जाणवण्याइतका फरक पडल्याचे दिसत नाही. ग्रामीणांच्या दुःखांच्या जखमांचे प्रदर्शन करीत ग्रामीण साहित्यिक सर्वमान्य साहित्यिकांच्या जत्रेत आपले पाल टाकून बसले, दलित वस्तीत बालपण कठोर अनुभवात गेल्यानंतर त्यातून वर उठू शकलेले आत्मचिरित्राच्या भांडवलावर सुखवस्तू बनले. बाबासाहेबांचे नाव घ्यावे आणि संध्याकाळचा 'पेला' चुकवू नये असा दलित नेत्यांचा वर्ग तयार झाला. तसेच, महिला चळवळीतही झाले. स्त्रीजन्माची कहाणी लक्षात घेणारे कुणी निघाले नाही, मुलगी म्हणून जन्मल्याच्या भांडवलावर सर्वमान्य पुरुष समाजात आपले स्थान भक्कम करू पाहणाऱ्यांच्या हाती स्त्रीचळवळ गेली. सर्वसाधारण सार्वजनिक चळवळीत विचारांची तर्कशुद्धता सोडली तर निदान यांच्यामागे जनमताचा किती पाठिंबा आहे ही एक तरी कसोटी लावली जाते. स्त्रियांच्या चळवळीत एवढीही कसोटी नाही. कार्यकर्ती चटपटीत दिसते मग बाकीचे प्रश्न निरर्थक आहेत. हजारो लाखोंनी स्त्रिया गोळा करू शकणारी आणि अवघ्या दोन वर्षांच्या काळांत जवळजवळ दोन लाख स्त्रियांच्या नावे शेतजमिनीची मालकी मिळवून देण्याचा चमत्कार करणारी, सरकारी मक्तेदारीची शेकडो दारूदुकाने उद्ध्वस्त करणारी शेतकरी महिला आघाडी या चळवळीच्या गणतीतही नाही. या चळवळीत शेतांत राबणाऱ्या बहुसंख्य शेतकरी, शेतमजूर स्त्रियांना स्थान नाही. या चळवळीच्या म्होरक्या झाडून सगळ्या शहरी, सुखवस्तू, बऱ्या पगाराच्या नोकऱ्या असणाऱ्या, आपण नोकरी करू लागल्यानंतर नवरा धुणीभांडी करण्यास मदत करत नाही या अन्यायाविरुद्धच्या चीडीमधून स्त्री-चळवळीची जाणीव झालेल्या.

### गरीब देशांतील स्त्रियांचा थाटमाट

बेजिंग येथे एक मोठे गमतीदार दृश्य दिसले. आफ्रिका आणि आशिया खंडातील मागास देशांच्या प्रतिनिधी सर्वात झगमगीत आणि थाटामाटाचे कपडे घालून मिरवत होत्या. आणि श्रीमंत देशांच्या प्रतिनिधी त्यांच्या नेहमीच्या औपचारिक वेषांत परिषदेस हजर राहत होत्या. संयुक्त राष्ट्र संघांच्या कार्यालयासमोर उभ्या असणाऱ्या लांबलचक आलिशान मोटारगाड्या तेवढ्या झाडून तिसऱ्या जगातील प्रतिनिधींच्या आणि छोट्या, तेल कमी खाणाऱ्या गाड्या श्रीमंत देशाच्या राजदूतांच्या असे दृश्य दिसतेच त्याचेच हे स्त्री परिषदेतील प्रतिबिंब. नैरोबी परिषदेत 'दोन हजार सालापर्यंत पूर्ण समानता' आणण्याची घोषणा झाली होती. इतर क्षेत्रांत समानता येवो न येवो पुरुष समाजातील सत्तेच्या उतरंडीला समांतर उतरंड स्त्रियांनीही २००० सालाच्या आधी करून दाखवली हे खरे.

बेजिंगच्या उरुसात स्त्रियांच्या प्रश्नावर चर्चा झाली ती सरकारी दृष्टीकोनातून. मंत्रालयाच्या पाचव्या मजल्यावर जाऊन बसलेले शेतकऱ्याचे पोर शेतकरी राहत नाही; सत्तेत गेलेला दलित मागे वळून आपल्या बांधवांकडे कणवेने पाहत नाही तसेच समाजात प्रतिष्ठा आणि स्थान मिळवलेली स्त्री बाकीच्या साऱ्या बहिणींच्या दुःखांना ओळखेनाशी होते. कुटुंबातील पुरुषांकडून मान्यता मिळावी यासाठी वयस्क स्त्रिया लेकीसुनांचा छळ करतात. तसेच पुरुषसत्ताक व्यवस्थेत स्थान मिळालेल्या स्त्रियांची भूमिका 'चुकून स्त्री जन्माला आलेल्या' अशी होऊन जाते. स्त्रियांना / दलितांना अधिकार देण्याच्या कार्यक्रमाला 'सक्षमीकरण' (Empowerment) असा एक बोजड शब्द वापरला जातो. 'सक्षमीकरणा'चा लाभ मिळालेल्या स्त्रिया इतर स्त्रियांच्या भल्याचे काम करतील ही अपेक्षा मुळात चूक. कुणब्यांच्या पोरांनी भट कारकुनाची जागा घेतली त्यामुळे कुणब्यांवरचा जुलुम थांबला नाही, वाढला. तसाच हा स्त्रीचळवळीतील अनुभव.

### मालकांचे प्रतिध्वनि

स्त्रिया आपापल्या पुरुषसत्ताक समाजाच्या मान्यतेसाठी धडपडतात. याचा एक मोठा पुरावा बेजिंग येथे मिळाला. पाश्चिमात्य देशातील ख्रिश्चन कॅथॉलिक पंथाचे आणि मुसलमानी समाजपद्धतीच्या पुरस्कर्त्यांचे नाके भले मोठे तंबू, राहुट्या, डेरे, सारा सरंजाम घेऊन भरभक्कम तयारीनिशी उपस्थित होते. 'समानता' या शब्दालादेखील त्यांचा विरोध होता. समानतेवर आधारलेल्या व्यवस्थेऐवजी 'न्याय्य' व्यवस्था असा शब्द वापरावा यावर त्यांनी आटोकाट प्रयत्न केले. आमच्या समाजव्यवस्थेत स्त्रीपुरुष सारखे मानले जात नाहीत, या दोघांच्या निसर्गदत्त भूमिका वेगवेगळ्या आहेत, स्त्री-पुरुष दोघे परस्परांना पूरक आहेत, एकसारखे नाहीत. असा त्यांचा आग्रह. याउलट, स्त्रियांनी पुरुष जे जे करतात ते करून दाखवावे; वेष, भाषा, व्यवसाय, लिंगव्यवहार या सर्वांच्या बाबतीत बरोबचे स्थान स्त्रियांना हवे आणि वर स्वतःच्या गर्भाशयावर त्यांचा संपूर्ण अधिकार पाहिजे, मुले होऊ देणे, होऊ न देणे, गर्भपात हे सगळे निर्णय

स्त्रियांच्या स्वाधीन पाहिजे, समलिंगी संबंध एवढेच नव्हे तर, समलिंगी विवाह यांनाही मान्यता मिळाली पाहिजे असा आग्रह पाश्चिमात्य देशातील प्रागतिक स्त्रिया करत होत्या. गंमत अशी की प्रत्येक देशातील स्त्रियांची मते त्यांच्या त्यांच्या समाजातील पुरुषांच्या मतांशी जुळणारी होती. मुसलमान स्त्रियांनी शरीयतची तरफदारी केली, कॅथॉलिक स्त्रियांनी घटस्फोट, गर्भपात यांना विरोध केला. या महत्त्वाच्या विषयांवर बेजिंगची परिषद स्त्रियांची राहिली नाही, पुरुषसत्तांच्या स्त्रीमुखंडांची ही परिषद झाली.

आंतरराष्ट्रीय परिषद म्हणजे, काही सर्वमान्य मसुदा ठरवून जाहिरनामा तयार करणे क्रमप्राप्तच आहे. सर्वच निर्णय सर्वसंमतीने ठरायचे, त्यामुळे मागास देशांतील मागास पुरुषांच्या शोभिवंत मुखंडांची जाहिरनाम्याच्या शब्दयोजनेत संख्याबळामुळे सरशी झाली.

श्रीमंत देशाच्या प्रतिनिधींना या प्रकाराची मोठी संवय आहे. जेथे जेथे संख्याबळाने निर्णय होतात तेथे तेथे आपले मत मांडावे पण तिसऱ्या जगातील 'भाऊ-गर्दीस' हवे ते ठराव करू द्यावेत. असल्या ठरावांना काळाच्या ओघात कागदाच्या कपट्यांचेही महत्त्व राहत नाही. ठराव काहीही करा त्याच्यामागे अर्थबळ उभे करणे श्रीमंत राष्ट्रांच्या हातची गोष्ट आहे, पैसे पुरवण्याबद्दल श्रीमंत राष्ट्रांनी थोडी कचकच सुरू केल्यावर त्याही विषयावर एक ठराव पसार झाला. पण ठराव झाल्यामुळे साधनसंपत्ती थोडीच तयार होते?

## समान नागरी कायदा

सामाजिक प्रश्न, लैंगिक हक्क, सामाजिक स्थान या साऱ्या प्रश्नांवरील चर्चेमधून एक गोष्ट विशेष स्पष्ट झाली. वेगवेगळ्या जातिधर्माचे समाज जेथे नांदत आहे तेथे समान नागरी कायदा ही कल्पना अशक्यप्राय आहे; प्रत्येक समाजाला आपल्या परंपरा, रीतिरिवाज, संस्कार प्रिय वाटतात; आपापल्या समाजातील भयानक रूढींचाही त्यात त्या समाजाचे मुखंड हिरीरीने पुरस्कार करतात. बेजिंग परिषदेचा पहिला धडा – समान नागरी व्यवस्था स्त्रियांवर अन्याय करणाऱ्या सर्व धर्मांचा आर्थिक प्रगतीच्या मोर्चासमोर उच्छेद झाल्याखेरीज संभव नाही. स्त्रीमुक्तीच्या दृष्टीने बेजिंग परिदेत एक पाऊल पुढे पडण्याऐवजी अर्धे पाऊल तरी मागे गेले असे दिसते. वेगवेगळ्या समाजपद्धतींची एखाद्या आंतराष्ट्रीय परिषदेमध्ये टक्कर घडवून आणण्याने काहीच साध्य होत नाही. उलट, प्रत्येक समाजातील स्त्रियांना आपापल्या पुरुषसत्ताक व्यवस्थांचे समर्थनच नव्हे, गुणवर्णन करणे भाग पडते. याउलट, स्त्रीविषयक परिषदा वेगवेगळ्या समाजांच्या किंवा प्रदेशांच्या स्वतंत्रपणे घेण्यात आल्या तर प्रत्येक परंपरागत व्यवस्थेच्या पोटात बंडाळी उभी राहण्याची शक्यता तयार होईल. एवढेच नव्हे तर, वेगवेगळ्या परिषदांच्या जाहिरनाम्यांची सार्वजनिक तुलना होईल आणि स्त्रीप्रश्नावर उदारमनस्कता दाखवण्याची एक स्पर्धा सुरू होईल. आजच्या परिस्थितीत आंतरराष्ट्रीय परिषद ही महिला मुखंडांची गरज आहे, जगभरच्या मायबहिणींची नाही.

बेजिंग येथे गाजलेला दुसरा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे आर्थिक समस्यांबद्दलचा. जगाच्या पाठीवरील बहुसंख्य स्त्रियांचा प्रश्न दररोजच्या पिण्याच्या पाण्याचा आहे, सरपणाचा आहे, साक्षरतेचा आहे. नियोजनाच्या कोणत्याही 'मॉडेल'मुळे या प्रश्नांबाबत काहीही सुधारणा घडून आलेली नाही.

## स्त्रीमुक्तीचे व्यस्त प्रमाण

आर्थिक धोरणासंबंधी चर्चा करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाच्या अनेक कायमस्वरूपी संघटना आहेत आणि अस्थायी परिषदा तर हरहमेश भरत असतात. बेजिंगच्या स्त्री परिषदेत या सगळ्याच प्रश्नांवर फिरून चर्चा करण्याचे काहीच कारण नव्हते. स्त्री परिषदेपुढे प्राधान्याने जे प्रश्न यावयास पाहिजे होते ते आलेच नाहीत. देशांचा विकास होतो, राष्ट्रीय उत्पन्न वाढते, सरासरी उत्पन्नही वाढते – कोणाचे कमी वाढते, कोणाचे अधिक वाढते; पण सर्व विकसनशील देशांचा अनुभव सांगतो की आर्थिक विकासाचा झिरपा स्त्रियांपर्यंत अनेकवेळा पोचत नाही, एवढेच नव्हे तर, उत्पन्नाचे नवे स्रोत मिळालेल्या समाजांत स्त्रियांची पिछेहाट होते. दारूचा राजकीय उपयोग, वाढती असुरक्षितता यामुळे स्त्री अधिकाधिक कोंडली जाते. यंत्रांमुळे कष्ट सुलभ होतात पण सुलभ झालेली कामे स्त्रियांकडून पुरुषांकडे जातात. चूल आणि मूल यांच्या धबडग्यात स्त्री अधिक गुंतून जाते. सार्वजनिक विकास आणि स्त्रियांची प्रगती यांचे व्यस्त प्रमाण ज्या ज्या क्षेत्रात आढळते त्यांचा विशेष अभ्यास बेजिंग येथे व्हावयास पाहिजे हाता, तो होण्याची सुतराम शक्यता नव्हती. कारण कोणत्याही देशातील शासनाच्या पातळीवरच या प्रश्नाचा विचार झालेला नाही.

## महिलांना मुक्तीचे वावडे

सार्वत्रिक विकासासाठी जी साधने कुचकामी ठरली ती साधने स्त्रियांच्या विकासासाठी उपयोगी पडतील असे काही सबळ प्रमाण असल्याखेरीज कसे मानावे? सर्वसाधारण विकासास अडथळा ठरलेली सर्वकष राज्यव्यवस्था स्त्रियांच्या मदतीला मात्र 'राखी बांधलेल्या भावा'सारखी येईल अशी भाबडी आशा ठेवण्यास काय आधार आहे?

वरून लादलेली कोणतीही व्यवस्था खऱ्या उत्पादकवर्गाला जाचक ठरते. अर्थात स्त्रियांनाही जाचक ठरते. गावाकडील लक्ष्मी शहराकडे नेण्याच्या कोणत्याही व्यवस्थेत स्त्रियांचे आयुष्य वैराण करून टाकणाऱ्या या प्रश्नांची सोडवणूक होऊ शकत नाही. पिण्याचे पाणी, सरपण, साक्षरता हे प्रश्न बेजिंगमध्ये जमलेल्या 'विशाल महिला मंडळा'च्या दृष्टीने किरकोळ महत्त्वाचे. नगरपालिकांचे नळ आणि स्वयंपाकाच्या गॅसच्या तयार टाक्या यांची चर्चा असती तर त्यातील काहीना तरी स्वारस्य वाटले असते. आर्थिक विषयपत्रिकेवर बेजिंग परिषदेत हात घातला तो एकदम खुल्या

व्यवस्थेच्या कल्पनेलाच. सर्व जग खुल्या व्यवस्थेकडे वेगवेगळ्या मार्गांनी आणि गतींनी प्रवास करीत आहे. शासन कोणतीही गोष्ट भलेपणे करू शकते यावर आता कोणाचाही विश्वास राहिलेला नाही आणि तरीही जगातील निम्म्या लोकसंख्यांच्या प्रतिनिधीत्वाचा कांगावा करणाऱ्या बेजिंग परिषदेने स्त्रियांची प्रगती बाजारपेठेच्या व्यवस्थेवर सोडता येणार नाही, त्यासाठी देशोदेशीच्या शासनांना जाणीवपूर्वक सघन पावले उचलावी लागतील असा ठराव जवळजवळ एकमताने केला. पाश्चिमात्य देशांतील स्त्रियांनीही या विषयी फारशी वादावादी केली नाही. ज्यांचे ज्यांचे म्हणून प्रचलित समाजव्यवस्थेमध्ये शोषण होते त्यांचा त्यांचा आग्रह शोषक व्यवस्था मोडून खुल्या व्यवस्थेकडे जाण्याचा असला पाहिजे. कारण, अशोषक आणि न्याय्य अशी शासनव्यवस्था असूच शकत नाही, हा इतिहासाने गेल्या शतकात मनुष्यजातीला शिकवलेला धडा आहे.

**स्त्रीचळवळीचे मार्क्सवादाशी लफडे**

मग तरीही सर्व स्त्रीप्रतिनिधींचा सरकारी छत्राखाली काम करण्याचा आग्रह का राहिला? याची दोन कारणे तरी स्पष्ट दिसतात.

गेल्या शंभरावर वर्षांत उभ्या राहिलेल्या शोषितांच्या सर्व चळवळींचा सैद्धांतिक आधार मार्क्सवादात होता. समाजवाद, साम्यवाद, मार्क्सवाद यांचा असा काही पगडा होता की आता जगाच्या अंतापर्यंत मार्क्सवादाला मरण नाही, इतर व्यवस्थांचे पतन आणि मरण हा फक्त दिवस मोजण्याचाच प्रश्न आहे असा सार्वत्रिक ग्रह झाला होता. डॉ. आंबेडकरांपासून रावसाहेब कसब्यांपर्यंत दलित चळवळीला मार्क्सवादाचा आधार देण्याचे भरकस प्रयत्न झाले. दलितांच्या उद्धाराचा मार्ग शहरातून आणि नोकऱ्यांतून जातो, बलुतेदारांच्या कौशल्याच्या यशस्वी बाजारपेठेतून नाही अशी बाष्कळ मांडणी दलित चळवळीनेही स्वीकारली.

शेतकरी चळवळीही 'छोटे शेतकरी, मोठे शेतकरी' या प्रश्नावर वितंडवाद घालीत, मार्क्सवादाच्या कच्छपी लागल्या.

एंगल्स्‌ची मांडणी हा स्त्रियांच्या चळवळीचा एक महत्त्वाचा आधार वर्षानुवर्षे राहिला. मार्क्सवाद्यांच्या कळपातील पुरुषी मनोवृत्ती, वर्ग-जाणीव आणि वर्गसंघर्ष या संकल्पनांना स्त्रीप्रश्नामुळे बसणारा छेद, 'चूल आणि मूल' यांचे सार्वजनिकीकरण असल्या मार्क्सवादी कल्पनांतील वाह्यातपणा महिला अग्रणींनी हिरीरीने मांडला. तरीदेखील, मार्क्सवाद आणि स्त्रीवाद यांच्यातील 'प्रेमप्रकरण' अद्याप संपलेले नाही. समाजवादाचा निःपात झाला तरी पूर्वाश्रमीच्या या लफड्याचे स्त्रीवाद्यांना अजून विस्मरण झालेले नाही. शोषकशोषित या रूपकातून पुरुष-स्त्री संबंधातील विश्लेषण करण्यासाठी जमवलेल्या शब्दावडंबराच्या स्त्रीवादी गुलाम बनल्या आहेत. खुल्या अर्थव्यवस्थेचा सर्वात अधिक फायदा सर्वसामान्य स्त्रियांना होणार आहे हे त्यांना उमजूच शकत नाही. खुल्या व्यवस्थेच्या संदर्भात स्त्रीप्रश्नाची मांडणी करण्याची सैद्धांतिक साधने एवढेच नव्हे तर ,शब्दप्रयोगही त्यांना अज्ञात आहेत. सामाजिक प्रश्नावर आपापल्या पुरुषांची 'री' ओढणाऱ्या स्त्रिया आर्थिक प्रश्नावर मात्र खुलीकरणाला विरोध करण्यास सज्ज झाल्या आहेत.

**मुखंडींचे सरकारप्रेम**

महिला मुखंडींच्या सरकारप्रेमाचे आणखी एक कारण संभवते. स्त्री चळवळीतील बहुतेक नेत्या 'नोकरदार' आहेत. उद्योजक, शेतकरी किंवा हातावर पोट असणाऱ्या कष्टकरी स्त्रिया बेजिंगमध्ये हजरच नव्हत्या. सरकारी साम्राज्य वाढावे, सरकारी खाती वाढावीत, त्यातील नोकरवर्ग वाढावा, नोकरवर्गाचे पगार वाढावेत ही सर्वच नोकरदारांची अपेक्षा असते. खुलीकरण आले की स्पर्धा आली, स्पर्धा आली म्हणजे सोयी सवलतींची लयलूट बंद पडणार, नोकरीची शाश्वती जाणार त्यामुळे सारे नोकरमाने खुलीकरणाला विरोध करण्यास सज्ज ठाकले आहेत. नोकरमान्या स्त्रिया स्त्री म्हणून बोलत नाहीत, नोकरमान्या म्हणून बोलतात. खुलीकरणाला बेजिंग येथे जमलेल्या स्त्रियांनी विरोध केला ते स्त्रियांच्या प्रवक्त्या म्हणून नव्हे! संयुक्त राष्ट्रसंघाच्या प्रभावी संघटनांत आणि परिषदांत खुल्या व्यवस्थेचा जयघोष चालू असतांना बेजिंगला झालेला विरुद्ध दिशेचा ठराव हा स्त्रियांनी पुरुषांच्या मध्य प्रवाहापासून दूर जाण्याचे धाडस दाखवल्याचे लक्षण नाही, तर नोकरमान्या स्त्री-मुखंडांनी नोकरमान्या मुखंडांच्या हितसंबंधी भूमिकेला दिलेला पाठिंबा आहे.

**सक्षमीकृत स्त्रियांची पुरुषसत्ता**

बेजिंग परिषदेच्या निमित्ताने महत्त्वाचा प्रश्न उभा राहिला आहे तो हा : 'सक्षमीकरणा'मुळे वाचा फुटलेल्या स्त्रिया त्यांच्या त्यांच्या पुरुषवर्गाची 'री' ओढत आहेत. भट कारकुनाची जागा घेतलेला कुणबी पोर शेतकऱ्यांस जीवानिशी सोडत नाही. तसेच राखीव जागांचा फायदा घेऊन पंच, सरपंच इत्यादि झालेली स्त्री त्या जागी असलेल्या पुरुष पुढाऱ्यांपेक्षा काहीच वेगळे करत नाही. 'सक्षमीकृत' स्त्री ही कोणत्याच स्त्रीचे प्रतिनिधीत्व करत नाही. सामाजिक प्रश्नांत आणि आर्थिक प्रश्नांत ती आपापल्या पुरुषांच्या कृपाकटाक्षांच्या अपेक्षेने भूमिका घेते, जीभ आणि लेखणी चालवते. बेजिंगच्या चौथ्या आंतरराष्ट्रीय महिला परिषदेने महिला परिषदांच्या एकूण संकल्पनेलाच जबरदस्त आव्हान दिले आहे.

बेजिंगचे वारे कानांत भरलेल्यांना याची जाणीव आज होत नसेल पण बेजिंग परिषदेने अजाणतेपणे का होईना स्त्री-चळवळीच्या सर्व संकल्पनेबद्दलच मोठे प्रश्नचिन्ह उभे केले आहे.

कदाचित घडले ते चांगलेच झाले. यापुढे तरी खऱ्याखुऱ्या स्त्रीमुक्ती चळवळीला सुरुवात होऊ शकेल.

●

# तुम्ही बेजिंगला जाल तेव्हा....

तुम्ही बेजिंगला जाल तेव्हा, तेवढं एक लक्षात ठेवा की, आम्हीसुद्धा ह्याच धरतीवरच्या स्त्रिया आहोत.

आम्ही..... उन्हातान्हात, पावसापाण्यात, कुडकुडवणाऱ्या थंडीत कष्ट सोसणाऱ्या, मुलाबाळांची, नवऱ्यांची, म्हाताऱ्याकोताऱ्यांची आणि एकमेकींची जपणूक करणाऱ्या, रहातं घर उजळून टाकणाऱ्या, शेतात पेरणी, कापणी करणाऱ्या, घरं बांधण्यासाठी माती उकरणाऱ्या, जनावरांना चरायला नेणाऱ्या, न्हाऊ घालणाऱ्या आणि मका, तांदूळ दळणाऱ्या....!

तुम्ही बेजिंगला जाल तेव्हा तेवढं एक लक्षात ठेवा की आम्हीसुद्धा त्या धरतीवरची लेकरं आहोत आणि ह्या धरतीवर आमचासुद्धा हक्क आहे. आम्ही जंगलं, खाणी, नद्या, शेतं यांचा नाश होऊ नये म्हणून त्यांची प्रयत्नपूर्वक जपणूक करतो, त्यांच्या संवर्धनाला हातभार लावतो. आम्ही ह्या भूतलावरील पंचमहाभूतांची राखण करतो आणि त्यांच्यावर जरबही बसवतो.

'विद्यावाचस्पती' (पीयच्डी) सारख्या पदव्या, सहा आकडी पगार, प्रवास आणि भत्त्यांचे हिशेब, अत्याधुनिक साड्या, ड्रेस, स्कर्ट आणि जीन्स हे सर्व मिरवत तुम्ही बेजिंगला जाल तेव्हा एक लक्षात ठेवा की आमच्याही स्वतःच्या काही फ्याशनी असतात. स्वतः हाताने शिवलेलं दाडांचं लुगडं किंवा घोंगडीचं इरलं आम्ही ऐटीत ठिगळं लपवत लपेटून घेतो, कधी बिनधास्त मोकळेपणाने, कधी धिटाईने, कधी आत्मविश्वासाने तर कधी अत्यंत चिकित्सक सावधगिरीने.

बेजिंगमध्ये असताना तुम्हाला सत्ता, सामर्थ्य, संपत्ती, मद्य, तंबाखू ह्या साऱ्यांची जेव्हा झिंग चढेल; बेजिंग मध्ये असताना खास प्राचीन इतिहासाचा वारसा सांगणारे तुमचे दागदागिने आणि मोठ्या प्रयत्नाने जोपासलेले तुमचे गुण ह्यांचे तुम्ही प्रदर्शन कराल तेव्हा लक्षात ठेवा की आम्हीही ह्या धरतीवरल्या स्त्रिया आहोत. आम्ही आमचे अन्नधान्य स्वतः पिकवतो, आमची दारूही आम्ही स्वतः गाळतो, वनौषधी, जडीबुटी स्वतःच गोळा करतो आणि चघळतो, आमच्या विड्याही आम्हीच करतो, ह्या मानवी समाजातील आम्ही हिरेमोती आहोत हे अभिमानाने सांगायची आम्हाला लाज वाटत नाही.

जेट विमानांमधून, लांबलचक वेगवान मोटारी आणि आराम गाड्यांतून तुम्ही चीनपर्यंत प्रवास कराल तेव्हा, वितंडवाद घालाल तेव्हा, तुम्ही तुमच्या स्वतःच्या कार्यालयांसाठी आणि सल्ला केंद्राची पोटे भरण्यासाठी वाटाघाटी, घासाघीस कराल तेव्हा आमची आठवण ठेवा, आम्ही ह्या धरतीवरल्या स्त्रिया....

आम्हीही प्रवास करतो पण प्रतिनिधी म्हणून नाही तर बेघर म्हणून. आणि तेही आमची जमीन, पाणी, वारे ह्यांच्या सीमा सांभाळूनच. आम्हीही प्रवास करतो.... पण तो अलिशान हॉटेले, अतिथिगृहे आणि वसतिगृहे ह्यांच्या दिशेने नाही, तर आमचा प्रवास आमच्या सुंदर शाकारलेल्या मातीच्या, दगडाच्या घरांकडून जुनी मेणकापडे व पत्रे यांनी झाकलेल्या झोपडपट्ट्यांतल्या दिशेने होतो आणि विषारी दलदलींमध्ये संपतो.

कडू वाटेल पण हे खरं आहे की आमचा प्रवास गर्तेच्या दिशेने होतो. आम्हाला तिकिटे, पासपोर्ट, पास, राजनैतिक सवलती यातील काहीही मिळत नाही; आमच्या वाट्याला येतात फक्त रोखलेल्या बंदुकी आणि सैनिकांच्या तुकड्या, बुलडोझर्स, क्रेन्स आणि राष्ट्रीय - आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या करवती; सामाजिक कार्यकर्त्यांची केवळ भावनिक मदत आणि त्यांची गुळमट मदतीची, पुनर्वसनाची आमिषे! आमच्या माळरानांमधून, डोंगरांमधून, दऱ्याखोऱ्यांतून जगलांमधून हाकलून आम्हाला सिमेंटच्या, चकचकीत प्लॅस्टिकच्या आधुनिक कोंडवाड्यांत कोंडलं जात असताना हे सारे घडते.

तुम्ही जेव्हा जगातील स्त्रियांच्या वतीने बोलण्याचा विचार कराल, जेव्हा तुम्ही तुमचे 'वाद', विचारप्रणाली, कार्यक्रम आणि धोरणे स्पष्ट कराल, मुक्ती, साक्षरता आणि 'सक्षमीकरण' ह्यावर प्रवचने झोडाल, जेव्हा तुम्ही लैंगिकता, भगिनीभाव आणि एकनिष्ठा ह्याबद्दल कल्पनेचे तारे तोडाल तेव्हा जगातील आम्हीही स्त्रियाच आहोत हे लक्षात असू द्या. कारण आमची साक्षरता फक्त अक्षरे आणि आकडे ह्यांच्याशी संलग्न नाही, आमची मुक्ती, आमचे 'सक्षमीकरण' आणि आमच्या रीतीभाती आमचे हात, हृदय, स्तन, गर्भाशय, प्रत्यक्ष जगणे, प्रेम आणि आत्मा ह्या साऱ्यांशी संलग्न आहे.

आमचे पूर्वज आमचे गुरु आहेत. ते नाचायचे तसेच आम्ही नाचतो. त्यांच्या गीतांच्या आणि काव्यांच्या संगतीने आम्ही आमची दुःखे आणि आनंद अनुभवतो. त्या काव्यांच्या नव्या नव्या आविष्कारात आमची ढोलकी तापतात, आमचे हास्यविनोद फुलतात, त्यातच आम्ही बेभान, धुंद होतो. आम्हाला पडलेले कूट प्रश्नही त्यांच्या साह्यानेच सोडवतो. आम्ही पूर्वजांची चिन्हे मिरवणारी, त्यांच्या मर्यादा, पावित्र्य, शुचिता सांभाळणारी स्वच्छंदी माणसे आहोत.

आणि बेजिंगमध्ये, आम्हाला आशा वाटते की, तुम्हालाही जीवनाचा 'लाओ झे' (चिनी तत्त्वज्ञ (इ.स. पूर्व ५००)) जाणवेल, जेव्हा तुमच्या सर्व आशाअपेक्षा दुरावतील, अदृष्य होतील. तेव्हा तुम्हीही ह्या जीवनातील वायु, जल, भूमी ह्यांचे सोहळे हसत आणि घाम गाळत साजरे कराल.

बेजिंगमधला तुमचा काळ चांगला जावो! आमच्या शुभेच्छा तुमच्या पाठीशी आहेत!

*बलजीत मलिक ह्यांच्या Indian Express*
*दि. ८/९/१९९५ मधील लेखाचा अनुवाद.*

# २. स्वराज्य अवतरले

या घटनेनंतर तिसऱ्याच दिवशी रात्री मेजर शांतपणे झोपेतच निधन पावला. फळबागेत खड्डा खणून तिथे त्याचा देह पुरण्यात आला. हा मार्च महिन्यातील पहिला आठवडा होता.

या नंतरच्या पुढच्या तीन महिन्यांत गुप्त स्वरूपाच्या बऱ्याच हालचाली करण्यात आल्या. जे अधिक हुषार प्राणी होते, त्यांना मेजरच्या भाषणाने एक जीवनविषयक नवाच दृष्टिकोण प्राप्त झाला होता. द्रष्ट्या मेजरने आपल्या भाकितात वर्तविलेला बंडाचा क्षण केव्हा येणार आहे हे त्याला माहीत नव्हते, हा क्षण आपल्या आयुष्याच्या कालावधीतच येईल याबद्दलही त्यांना खात्री नव्हती. पण हा क्षण आला पाहिजे, यासाठी सर्वतोपरीने कष्ट करीत राहणे हे आपले प्रथम कर्तव्य आहे, याचा त्यांना कधी विसर पडला नाही. सर्वांना प्रशिक्षित व संघटित करण्याच्या कार्यक्रमाचा भार अखेर डुकरांवरच येऊन पडला. कारण प्राण्यांमध्ये सर्वांत डुकरे हीच जास्त बुद्धिमान आहेत असा सार्वत्रिक समज होता.

या डुकरांमध्येही स्नोबॉल आणि नेपोलियन हे दोन तरुण डुक्कर प्रमुख होते. डुकराच्या उत्तम पैदाशीसाठी जोन्स त्यांना पोसत होता.

नेपोलियन हा धिप्पाड, उग्र आणि भयंकर स्वरूपाचा डुक्कर होता. तो फारसा बोलत नसे. परंतु स्वतःच्या मार्गाने सरळ, निर्धारपूर्वक चालण्याबद्दल त्याची प्राणी-जगतात कीर्ती होती.

स्नोबॉल हा नेपोलियनपेक्षा अधिक उत्साही दिसे. त्याच्या बोलण्यातून त्याची शोधकवृत्ती दिसत असे.

त्यानंतर डुकरांमध्ये स्क्वीलर हे लठ्ठ पोर उठून दिसे. त्याचे गुबगुबीत गोबरे गाल, लुकलुकती नजर, त्याच्या चपळ हालचाली आणि धारदार आवाज यामुळे तो लोकप्रिय होता. तो एक बुद्धिमान वक्ता होता. एखादा अवघड मुद्दा पटवून देताना तो इकडून तिकडून नाचल्यासारखे करी आणि आपले शेपूट जोरजोराने हलवी. मुद्दा पटवून देण्यात त्याचे हे हावभाव परिणामकारक ठरत. खऱ्याचे खोटे आणि खोट्याचे खरे करून दाखवण्याची किमया स्क्वीलरजवळ आहे असे सर्वांचे मत होते.

मेजरने जी शिकवण दिली, तिच्यातून या त्रिकूटाने एक सर्वांगीण तत्त्वज्ञान शास्त्रीय पद्धतीतून उभे केले. त्याला नाव दिले 'पशुवाद'. या सिद्धांताचे इतर प्राण्यांपुढे विवरण करण्यात आठवड्यातील बऱ्याच रात्री जात. जोन्स झोपी गेल्यावर गुप्तपणे या बैठकांचे कामकाज चाले.

सुरुवातीला प्राण्यांच्या मूर्खपणाला आणि औदासिन्याला या तिघांना तोंड द्यावे लागले! 'आपण जोन्सशी इमानदार राहिले पाहिजे आणि एकनिष्ठ रहायला पाहिजे. जोन्स आपल्याला खाऊपिऊ घालतो आणि तो गेला तर आपण उपासमारीने मरू!' अशी मूर्खपणाची शंका काहीजण प्रदर्शित करीत. आपल्या मृत्यूनंतर काय काय घडामोडी होतील याची आताच कशाला चिंता करा, असाही विचार काहीजण करीत. काहीजण म्हणत की क्रांती जर निश्चितपणे होणार असेल तर आपण त्यासाठी धडपड व परिश्रम करण्याची काय जरूरी आहे! या साऱ्या शंकाकुशंका 'पशुवादा'च्या विरोधी आहेत हे या प्राण्यांना पटवून देणे हे या तिघांनाही बरेच जड गेले.

सर्वांत मूर्खपणाचे प्रश्न केले मॉली या पांढऱ्या घोडीने. स्नोबॉलला तिने पहिला प्रश्न केला,'आज गुळाचा खडा मिळतो तसा क्रांतीनंतर मिळेल का?'

'नाही!' स्नोबॉलनी ठामपणे उत्तर दिले. 'आपल्याकडे गूळ बनविण्याची साधने नाहीत. शिवाय तुला गुळाची आवश्यकता नाही. तुला गरजेपुरते गवत, हरभरा अशी चंदी मिळेल.'

'आज माझ्या आयाळीवर जशा रिबिनी आहेत तशाच रिबिनी नंतर मिळतील काय?' मॉलीने दुसरा प्रश्न केला.

'मुळीच नाही!' स्नोबॉल उत्तरला. 'बंधुभगिनींनो, तुम्हाला एवढ्या आवडणाऱ्या या रिबिनी म्हणजे गुलामगिरीची निशाणी आहे. स्वातंत्र्याचे मोल या रिबिनीपेक्षा केवढे मोठे आहे हे तुम्हाला समजत नाही काय?'

अखेरीस मॉलीने हा मुद्दा मान्य केला. परंतु तेवढ्यावरच तिचे समाधान झालेले नव्हते.

मोझेस या डोमकावळ्याने ज्या अफवा पसरवल्या, त्यावर मात करण्यासाठी तर डुकरांना बरेच झुंजावे लागले. सगळे प्राणी मृत्यूनंतर 'साखऱ्या' पर्वत नावाच्या गूढ प्रदेशात जातात आणि त्या देशाची आपल्याला इत्थंभूत माहिती आहे असे तो सांगे. या साखऱ्या पर्वतावर सातही दिवस सुटीच असते. फळाफुलांनी बहरलेला ऋतूच वर्षभर असतो, गूळ आणि सरकीची पेंड तिथे कुंपणावरच उगवते असे तो सांगत असे. काही प्राण्यांना मोझेसचा राग येई. कारण तो नुसताच गप्पा मारीत बसे आणि काम काहीच करीत नसे. पण तरी 'साखऱ्या पर्वत' कुठे तरी आहेच यावर काहीजणांची श्रद्धा होती. अशा प्रकारचा 'साखऱ्या पर्वत' कुठेही अस्तित्वात नाही, हे या प्राण्यांना समजावून सांगण्यासाठी डुकरांना बरेच कष्ट घ्यावे लागले.

क्लोवर आणि बॉक्सर ही दोन घोडी त्यांची निष्ठावंत अनुयायी होती. डुकरांना एकदा पुढारी मानल्यानंतर ते जे सांगतील ते सारे ही घोडी आत्मसात करीत. आणि

## जनावरांचे शिवार

**जॉर्ज ऑरवेल यांच्या Animal Farm चे भाषांतर : श्री. रमेश मुधोळकर (१९८५)**

**पूर्वसूत्र**

**त्या रात्री मानव-कृषि-संस्थेतील सर्व प्राण्यांच्या सभेत मेजर या वयोवृद्ध डुकराने सर्व प्राण्यांच्या पराधीनतेचे व हालअपेष्टांचे सविस्तर वर्णन करून 'स्वराज्याचे साकडे' घातले. त्याच्या भाषणाने प्रभावित झालेल्या त्या प्राण्यांनी त्याने शिकविलेले 'देशातील पशूनो' हे गाणे एकदा नव्हे, दोनदा नव्हे पाचदा वाढत्या उत्साहाने व वाढत्या आवाजात म्हटले. त्या आवाजाने जागा झालेल्या जोन्सने झाडलेल्या बंदुकीच्या आवाजाने सर्व प्राणी आपापल्या जागी पळून गेले व झोपी गेले. पुढे 'स्वराज्या'चे काय झाले?**

साध्या युक्तिवादाने ते इतर प्राण्यांपर्यंत पोहोचवीत. गोदामातील एकही बैठक त्यांनी चुकवली नाही. बैठकीनंतर 'देशातील पशूंनो' या गीताचा प्रारंभही घोडीच करीत.

अखेरीस एकदाचा तो क्षण आला! क्रांतीचा उठाव अपेक्षेपेक्षा लवकर झाला. कुणाच्याही अंदाजापेक्षा अगदी सहजगत्या क्रांती झाली.

जोन्स हा पूर्वी खूप मोठा शेतकरी होता. पण अलिकडे त्याला वाईट दिवस आले होते. एका खटल्यात बरीच मालमत्ता गमावल्याने तो खचून गेला होता. त्यातच त्याने दारू प्यायला सुरुवात केली होती. त्याचे नोकर-चाकरही आळशी आणि लबाड होते. त्यामुळे शेतात सगळीकडे तण माजले होते. छपराची शाकारणी तशीच राहिली होती. जनावरांना दाणापाणीही वेळेवर मिळत नव्हता.

गवतकापणीच्या हंगामात एके दिवशी संध्याकाळी जोन्स जवळच्याच गावी जाऊन दारू ढोसत बसला. तो दुसऱ्या दिवशी दुपारी शेतावर परतला. त्याच्या गड्यांनी गाईच्या धारा काढल्या आणि ते सशाच्या शिकारीसाठी निघून गेले. जनावरांना चारा टाकण्याचीही फिकीर त्यांनी केली नाही. जोन्सही आला तो 'जागतिक वृत्त'चा अंक तोंडावर घेऊन पलंगावर आडवा पडला.

संध्याकाळपर्यंत जनावरांच्या पोटात अन्नाचा कणही नव्हता. आता त्यांच्या सहनशक्तीने मर्यादा ओलांडली होती. एका गायीने गोठ्याचे दार शिंगांनी मोडून टाकले. बाकीच्या प्राण्यांनीही धडपड करून सुटका करून घेतली. या गडबड-गोंधळामुळे जोन्स जागा झाला. दुसऱ्याच क्षणी आपला चाबूक काड्काड् वाजवीत जोन्स आणि त्याचे गडी गोठ्याजवळ दाखल झाले. भुकेने हैराण झालेल्या प्राण्यांना हे सारे असह्य झाले. ते एकजुटीने जोन्स आणि त्याच्या लोकांवर तुटून पडले. जोन्स आणि त्याच्या गड्यांना आता चहूबाजूंनी लाथा आणि धडका बसू लागल्या. परिस्थिती पूर्णपणे त्यांच्या नियंत्रणाबाहेर गेली. जनावरांची अशा तऱ्हेची वागणूक त्यांनी यापूर्वी कधीही पाहिली नव्हती. जनावरांनी अकस्मात केलेला उठाव पाहून ते इतके घाबरले की त्यांची शुद्धबुद्धच हरपली. स्वतःचा बचाव करण्यासाठी त्यांनी अक्षरशः पळ काढला. साऱ्या जनावरांनी विजयोन्मादाने त्यांचा पाठलाग करून त्यांना हाकून लावले.

जोन्सच्या बायकोने बंगल्याची खिडकी उघडून हळूच बाहेर पाहिले. बाहेर चाललेला प्रकार पाहून तिने एका पिशवीत काही वस्तू भरल्या आणि मागच्या दरवाज्याने ती बाहेर पडली. मोझेसने तिला सहज पाहिले आणि काव काव करीत तिच्यामागे जाऊ लागला. दरम्यान, सर्व जनावरांनी जोन्स आणि त्याच्या गड्यांचा लांबवर पाठलाग केला. नंतर ते परतले. शेतवाडीच्या आवारात सर्वजण परत येताच मोठा दरवाजा त्यांनी लावून घेतला. काय घडते आहे हे त्यांना कळण्याच्या आतच क्रांती होऊन गेली होती आणि ती यशस्वी झाली होती. जोन्सची हकालपट्टी करण्यात आली आणि मानव कृषिसंस्था आता प्राण्यांच्या मालकीची झाली होती.

आपल्या भाग्योदयाचा कालखंड खरोखरच आला आहे यावर या प्राण्यांचा विश्वासही बसला नाही. त्यांनी चारही सीमांना जाऊन कुठे माणूस लपला तर नाही याची खात्री करून घेतली. त्यानंतर धावतच ते जोन्सच्या बंगल्याकडे गेले. त्याच्या जुलमी राजवटीचे उरलेसुरले अवशेष उद्ध्वस्त करण्याच्या कामास ते लागले. तबेल्याजवळची खोली त्यांनी फोडली आणि त्यातील लगाम, वेसणी, कुत्र्याच्या साखळ्या बाहेर काढल्या. डुकरांना व बोकडांना खच्ची करण्यासाठी जोन्स जो चिमटा वापरीत असे तो चिमटाही त्यांनी शोधून काढला आणि हे सर्व साहित्य प्राण्यांनी विहिरीत फेकून दिले. कासरे, झापडी, मुसक्या अशाही साऱ्या वस्तु एकत्र करून बाहेरच्या आवारात त्यांची होळी पेटवण्यात आली. आसूडही त्यांनी त्वेषाने त्या आगीत फेकून दिले. पेटलेल्या ज्वाळांमध्ये चाबूक जळू लागताच सर्व प्राणी आनंदाने नाचू लागले. घोड्यांच्या आयाळ आणि शेपट्यांना ज्या रंगीत रिबिनी लावण्यात येत त्यादेखील स्नोबॉलने आगीत भिरकावून दिल्या.

'रिबिनी म्हणजे कपडे होत. कपडे ही माणसाची निशाणी आहे. म्हणून कोणत्याही प्राण्याने कपडे वापरू नयेत.' स्नोबॉलने स्पष्टीकरण केले.

जोन्सची आठवण देणारी प्रत्येक गोष्ट या प्राण्यांनी थोड्याच अवधीत नष्ट केली. नेपोलियन सर्व प्राण्यांना घेऊन पुन्हा कोठाराकडे गेला. तिथे त्याने सर्वांना नेहमीपेक्षा दुप्पट गवत आणि धान्य दिले. कुत्र्यांना दोन दोन बिस्किटे दिली. त्यानंतर शेतीवाडीच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत धावून प्राण्यांनी 'देशातील पशूंनो' हे गीत म्हटले. नंतर शांत होऊन ते आपापल्या जागी बसले आणि झोपी गेले. अशी गाढ झोप त्यांना उभ्या जन्मात मिळाली नव्हती.

पहाटे जेव्हा ते उठले, तेव्हा रात्रीच्या घटनांचा चित्रपट एकदम त्यांच्या डोळ्यासमोर उभा राहिला. आपल्या पराक्रमाची अठवण होऊन धावत ते कुरणात शिरले. कुरणाला लागून असलेल्या टेकाडावर ते उभे राहिले. प्रभातकाळच्या स्वच्छ उजेडात त्यांना सर्व शेतीवाडी दिसत होती. आता हे सारे आपल्याच मालकीचे हा विचार मनात येऊन ते अत्यानंदाने स्वतःभोवती गिरक्या घेऊ लागले. हवेत उंच उंच उड्या मारू लागले. दवात लोळू लागले गोड गोड गवताचे तोबरे भरू लागले. मातीच्या मोठ्यामोठ्या ढेकळांवर लाथा मारून त्यांचा सुगंध नाकात भरून घेऊ लागले. नंतर त्यांनी आपला तपासणी दौरा सुरू केला.

नीट रांग करून सर्व प्राणी बंगल्याकडे आले. बंगल्याबाहेर कवायतीच्या शिस्तीत शांत उभे राहिले. हा बंगलासुद्धा आता त्यांच्याच मालकीचा होता. पण आत जायला त्यांना भीती वाटत होती. तथापि, स्नोबॉलने आणि नेपोलियनने आपल्या खांद्यानी धक्के देऊन दरवाजा उघडला. सर्व प्राण्यांनी रांगेने आत प्रवेश केला. चालताना कशालाही आपला धक्का लागू नये यासाठी ते

पराकोटीची काळजी घेत होते. अत्यंत नाजूकपणे पावले टाकीत ते या खोलीतून त्या खोलीत जात होते. त्यांची कुजबूजसुद्धा कमालीच्या बारीक आवाजात चालू होती. त्या बंगल्यातील एकापेक्षा एक अलिशान वस्तू पाहून ते सारे हतबद्ध झाले होते. तिथे मोठे पलंग होते, पाखरांच्या पिसांच्या मऊ मऊ गाद्या होत्या. झुंबरे होती. विलासाच्या नाना चिजा होत्या.

पायऱ्या उतरून ते सारे खाली आले तेव्हा मॉली ही घोडी कुठे तरी गायब झाली होती. तिचा शोध घेतला, तेव्हा ती बेडरूममध्ये सापडली. जोन्सच्या बायकोच्या ड्रेसिंग टेबलाच्या खणातून एक सुंदर निळी रिबिन काढून तिने ती अंगावर घेतली आणि मोठ्या गर्वाने आरशात पाहात राहिली. त्याबद्दल इतरांनी कडक शब्दांत तिला ताकीद दिली. स्वयंपाकघरात डुकरांच्या काही तंगड्या टांगून ठेवल्या होत्या. त्या त्यांनी बाहेर आणून पुरून टाकल्या. बिअरचे पिंप बॉक्सरने एका लाथेने उडवून टाकले. या व्यतिरिक्त त्यांनी कशालाही हात – नव्हे – पायही लावला नाही.

हा बंगला म्युझियम म्हणून ठेवावा असा ठराव जागच्या जागी संमत करण्यात आला. त्यात कुणाही प्राण्याने राहू नये, असेही सर्वानुमते ठरले.

प्राण्यांची न्याहारी झाल्यानंतर स्नोबॉल आणि नेपोलियनने सर्वांना एकत्र बोलावले. स्नोबॉल म्हणाला, 'कॉम्रेड्स्, आता साडेसात वाजत असून अजून सारा दिवस जायचा आहे. तेव्हा आपण गवत कापणीच्या कामाला सुरुवात करू. परंतु त्यापूर्वी आणखी एक महत्त्वाचे काम आपल्याला करायचे आहे. ते म्हणजे 'मानव-कृषि-संस्था' हे नाव काढून त्याजागी 'पशु-कृषि-संस्था' हे नाव आपल्याला द्यायचे आहे.'

नेपोलियनने लगेच काळ्या आणि पांढऱ्या रंगाचे डबे मागवले गेटवर 'मानव-कृषि-संस्था' अशी पाटी लिहीली होती, ती पाटी पुसून त्या जागी 'पशु-कृषि-संस्था' अशी नवी अक्षरे स्नोबॉलने लिहिली. कारण लिहिण्यात स्नोबॉलची चांगलीच गती होती.

गेल्या तीन महिन्यांत लिहायला वाचायला शिकून डुकरांनी आपले शिक्षण पूर्ण केलेले होते. जोन्सच्या पोरींनी उकिरड्यावर फेकलेल्या बाराखडीच्या पुस्तकांचा त्यांनी शिक्षणासाठी उपयोगी करून घेतला होता.

यापुढे शेतवाडीचे व संस्थेचे नाव 'पशु-कृषि-संस्था' असे वापरण्यात येणार होते.

गेल्या तीन महिन्यांच्या काळात पशुवाद-तत्त्वज्ञानाचा प्रदीर्घ अभ्यास करून डुकरांनी त्यातून मूलभूत स्वरूपाच्या सहा आज्ञा शोधून काढल्या होत्या. या आज्ञा गोदामाच्या भिंतीवर लिहिण्यात येणार होत्या. भविष्यकाळात कधीही बदलली न जाणारी अशी ही वैधानिक संहिता होत. पशु-कृषि-संस्थेतील सर्व प्राण्यांचे जीवन या घटनेने नियमित आणि नियंत्रित केले जाणार होते.

सर्व प्राणी मिरवणुकीने इमारतीच्या बाजूला आले. स्नोबॉल आणि नेपोलियनने एक शिडी गोदामाच्या भिंतीला लावली. थोड्याशा कष्टाने स्नोबॉल शिडीवर चढला. स्नोबॉल ज्या पायरीवर उभा होता त्याखाली आणखी दोन पायऱ्यांवर स्क्वीलर रंगाचे डबे घेऊन उभा होता. डांबरासारख्या काळ्या भिंतीवर मोठमोठ्या अक्षरांत स्नोबॉलने हे सहा नियम लिहिले. शंभर फुटांवरूनसुद्धा हे आदेश वाचता येतील असे मोठे अक्षर होते.

हे आदेश म्हणजे –

- जो दोन पायांवर चालतो तो शत्रू आहे.
- जो चार पायांवर चालतो किंवा ज्याला पंख आहेत तो मित्र आहे.
- कुणीही प्राणी कपडे वापरणार नाही.
- कोणताही प्राणी पलंगावर झोपणार नाही.
- कोणत्याही प्राण्याने दुसऱ्याला ठार मारू नये.
- सर्व प्राणी समान आहेत.

हे आदेश फार वळणदार अक्षरात लिहिण्यात आले होते.

शुद्धलेखनाची एखाद दुसरी बारीक चूक वगळता सर्व काही नीट आणि टापटिपीने लिहिण्यात आले होते. डुकरांखेरीज बाकीच्यांना वाचता येत नसल्याने स्नोबॉलने ती कलमे सगळ्यांना मोठ्याने वाचून दाखवली. माना डोलावून सगळ्यांनी संमती व्यक्त केली.

स्नोबॉलने पंजातील ब्रश फेकून दिला आणि एक उत्साहभरित आदेश दिला. तो म्हणाला, 'कॉम्रेडस्, चला आता आपण गवतकापणीच्या कामाला लागू या. जोन्सच्या गड्यांपेक्षा जास्त वेगाने गवत कापण्याचा आपण निर्धार करू या.'

स्नोबॉलचे बोलणे पुरे होते न होते तोच गाई हंबरू लागल्या. त्या बेचैन झाल्या होत्या, कारण गेल्या चोवीस तासांत त्यांचे दूध काढले गेले नव्हते. त्यांचे स्तन दुधाने तटतटून गेले होते. डुकरांनी ताबडतोब दूध साठविण्याच्या बादल्या आणल्या आणि गाईचे दूध काढले. थोडथोडके नव्हे तर पाच बादल्या भरून फेसाळ दूध काढले गेले. सर्व प्राणी अतिशय उत्सुकतेने त्याच्याकडे पाहू लागले.

'या सगळ्या दुधाचे आता काय करणार?' कुणीतरी विचारले.

'जोन्स आम्हाला कणी-कोंडा खायला घाली त्यात थोडे दूधही टाकीत असे.' एक कोंबडी उद्‌गारली.

तेवढ्यात नेपोलियन ओरडला, 'बंधूभगिनींनो, दुधाचा विचार तुम्ही आपल्या डोक्यातून काढून टाका. दुधाची काळजी आम्ही घेऊ. गवतकापणीचे महत्त्वाचे काम आता सुरू होईल. कॉम्रेडस्, स्नोबॉल तुमचे या कामात नेतृत्व करील. मी मागून येतोच आहे.'

सर्व प्राणी गवतकापणीच्या मोहिमेवर गेले. त्यानंतर संध्याकाळी त्यांनी परत येऊन पाहिले तर दूध गायब झालेले होते!

●

पुढील प्रकरण.....

**चार पाय छान, दोन पाय वाईट**

# जमीन सुधारणेचे भाट

## - शरद जोशी

२१ ऑगस्ट १९९५ रोजी राज्यसभेसमोर ८१ वे घटना दुरूस्ती विधेयक आले. सरकारने सुचवलेली घटनादुरूस्ती एकमताने विनाविलंब मंजूर करण्यात आली. परिणामतः, घटनेच्या ९ व्या अनुसूचीतील कायद्यांची यादी आणखी लांबली. या यादीत आता किती कायदे आहेत याची मोजदाद कोणाकडेच नसावी; हा आकडा ३०० च्या आसपास गेला असावा.

याचा अर्थ असा की, लोकतंत्र मिरवणाऱ्या या देशात खुल्या व्यवस्थेचे नगारे पिटणारे शासन असताना स्वातंत्र्याची भयानक गळचेपी करणारा प्रस्ताव संसदेत बसलेल्या, वेगवेगळ्या पक्षाच्या खासदारांनी सहज संमत करून टाकला. या दुरूस्तीमुळे आता सात राज्यांतील भूमिसुधार कायद्यांना ते घटनेच्या मूलतत्त्वांच्या विरोधी असले तरीही आव्हान देता येणार नाही. त्यामुळे, या राज्यांतील कमाल जमीनधारणा कायद्यान्वये अतिरिक्त ठरलेल्या २३ लाख एकर जमिनीपैकी ११ लाख एकर जमिनीचे फेरवाटप करणे शक्य होईल. घटनेतील ९ वी अनुसूची ही किती क्रूर आणि अन्यायकारक आहे याबद्दल पूर्वी अनेकदा चर्चा झालेली आहे. नेहरूंच्या समाजवादी जमान्यात ज्यांच्याकडे जास्त जमीन आहे त्यांच्याकडून ती काढून घेऊन भूमिहीनांना वाटल्याने शेतीचे आणि ग्रामीण अर्थ-व्यवस्थेचे मोठे कोटकल्याण होणार आहे अशी समजूत होती. जमिनीच्या फेरवाटपासाठी प्रथमतः जमीनदारांविरुद्ध कायदे करण्यात आले; मग स्वतः जमीन न कसणाऱ्या आणि कुळांकडून जमीन कसून घेणाऱ्या शेतकऱ्यांविरुद्ध कायदे झाले. त्यानंतर, कमाल जमीनधारणेचा पहिला कायदा झाला. तेवढ्याने भागले नाही म्हणून की काय, कमाल जमीन-धारणेचा आकार आणखी एकदा कमी करण्यात आला. त्यानंतर, शहरांच्या आसपासच्या शेतजमिनी ताब्यात घेण्यासाठी कायदे झाले. एवढेच नव्हे तर सरकारी उद्योगधंद्यांना लागणारी जमीन संपादन करण्यासाठी सरकारच्या हाती अनियंत्रित अधिकार देण्यात आले. जमिनीच्या किंमती सतत भडकत राहिल्याने जमिनी बळकावणे हा पुढाऱ्यांचा आवडता खेळ झाला. मध्य युगातील सुलतानांनी, कोणा गर्ती बाईवर नजर गेली की तिला खुशाल उचलून आणावी असे घडे. विसाव्या शतकात नेहरू जमान्यात शेतकऱ्याच्या काळ्या आईसंबंधी हेच सर्रास घडू लागले.

समाजवादी व्यवस्थेत देशाच्या कल्याणाचे नाव घेतले की कोणा व्यक्तीची काय विटंबना होते याची फिकीर नसते. आम जनतेच्या भल्याकरिता कोणाही व्यक्तीने अशी तोशीस सोसली पाहिजे आणि आनंदाने सोसली पाहिजे हा मूलभूत सिद्धांत आहे.

पण, भारतीय राज्यघटना समाजवादी नव्हती. समता, न्याय आणि व्यक्तिस्वातंत्र्याच्या पायावर घटनेची बांधणी झाली होती. शासनाला कोणाची मालमत्ता काढून घ्यायची असेल तर योग्य सार्वजनिक कारण दाखवले पाहिजे आणि मालकास योग्य तो मोबदला दिला पाहिजे अशी स्पष्ट तरतूद आंबेडकरी घटनेत होती. समाजवाद्यांना ती कल्पनाच विषसमान होती.

घटनेवरील सह्यांची शाई अक्षरशः वाळण्याआधी पहिली दुरूस्ती सुचवण्यात आली; आणि मालमत्ता संपादणे, वहिवाट करणे आणि तिचे हस्तांतर करणे या मूलभूत हक्कावर गदा आणण्यात आली. जमिनी काढून घेण्याकरितां प्रत्येक राज्यात कायदे झाले. ते घटनाबाह्य असल्याचे देशभरच्या न्यायालयांनी ठरवले. सरसकट कोणतीही मालमत्ता विनामोबदला कोणतेही कारण न देता सरकार काढून घेऊ शकेल अशी दुरूस्ती नेहरू सरकारला करता आली असती, पण त्यामुळे बिगरशेती मालमत्तेच्या हक्कांवरही गदा आली असती. शेतकऱ्यांची मालमत्ता तर काढून घेता आली पाहिजे. बिगरशेती मालमत्तेला तर धक्का लागू नये अशी काय युक्ती काढावी? नेहरूंच्या सुपीक डोक्यातून कल्पना निघाली. शेतकऱ्यांना न्यायालयांत दाद मागताच येऊ नये अशी व्यवस्था करण्यासाठी घटनेत दुरूस्ती झाली. ९ व्या अनुसूचीची स्थापना झाली. या अनुसूचीत दाखल झालेल्या कायद्यांविरुद्ध न्यायालयात दाद मागताच येणार नाही अशी तरतूद करण्यात आली. नेहरूंचा लोकशाहीप्रेमी म्हणून गाजावाजा चालूच राहिला.

जमीन संपादनाच्या कायद्यात सर्वत्र एक अशीच तरतूद आहे. जमीन संपादनाच्या कोणत्याही प्रकरणी खालच्या कोर्टात कोणाही शेतकऱ्यास दाद मागता येऊ नये अशी कडेकोट व्यवस्था झाली, आणि घटनेने दिलेल्या मूलभूत हक्कांची पायमल्ली होत असती तरी शेतकऱ्यांना न्यायालयात जाता येऊ नये अशी व्यवस्था करण्यात आली.

झाले गेले गंगेला मिळाले. तो जमानाच समाजवाद नावाच्या अजागळ विचाराचा होता. शेतकऱ्यांची लूट हा सर्व समाजवादी व्यवस्थांचा पाया होता. शेतकऱ्यांमध्ये छोटे मोठे असा भेदाभेद करून त्यांना सगळ्यांनाच वेठीला जुंपण्याचा कार्यक्रम राबवला जात होता. क्रूरकर्मा स्टॅलीन त्यासाठी रणगाडे वापरत होता. मधुर हास्य आणि छातीवर गुलाब मिरवणाऱ्या नेहरूंनी तेच काम जास्त कुशलतेने केले. पंडित जगन्नाथाची उक्ती आहे, 'कश्मीरात जन्मलेले दुष्टकृत्येसुद्धां मोठ्या सुहास्यमुद्रेने करतात.'

आर्थिक विषमता दूर करण्याचा टेंभा मिरवणाऱ्यांनी बिगरशेती मालमत्ता मर्यादित करण्याचा कधी विचारही केला नाही. न्याय, समता काय ती शेतजमिनीच्या आकाराला लागू, इतर जमिनी, कारखाने यांना नाही असे हे भयानक कारस्थान. वीस लाख रुपयांच्या शहरी फ्लॅटमध्ये राहायचे आणि १८ एकर शेती असणाऱ्या शेतकऱ्याचा 'कुलक' म्हणून उपहास करायचा, त्यांच्याविरुद्ध द्वेषाचा अंगार ओकायचा हा सर्व डाव्यांचा छंदच झाला!

आकडेवारीने पाहिले तर सर्व अतिरिक्त जमीन संपादन केली गेली असती आणि तिचे तत्परतेने फेरवाटप झाले असते तरीदेखील भूमिहीनांचा प्रश्न अंशमात्रानेही सुटला नसता. त्यानंतर, आता तीन पिढ्या होऊन गेल्या. काही थोडी जमीनदारी सोडली तर ज्याकरितां जीवाचा आटापिटा करावा अशी अतिरिक्त जमीन कुणाकडेही राहिलेली नाही आणि तरीदेखील जमीनसुधारणेच्या घोषणा होत असतात.

जमिनीच्या फेरवाटपामुळे लाभधारी शेतकऱ्यांचा काही फायदा झाला असाही काही पुरावा नाही. पश्चिम बंगालसारख्या साम्यवादी राज्यात मोठ्या उत्साहाने जमीन सुधाराचे कलम राबवण्यात आले. जमिनीचे लहान लहान तुकडे झाले आणि बंगाली शेती भूकेकंगाल झाली. हा अनुभव घेऊनही आता जमिनीच्या फेरवाटपाच्या प्रश्नासंबंधी काही फेरविचार करण्याची गरज असल्याचे कोणाला जाणवत नाही.

नेहरूव्यवस्था संपली, खुल्या व्यवस्थेचा बोलबाला सुरू झाला, आता बाजारपेठेचे श्रेष्ठत्व मान्य झाले. खरे म्हटले तर, मालमत्तेचा मूलभूत हक्क नागरिकांच्या हाती पुन्हा सुपूर्द करण्यासाठी नेहरू आणि इंदिरा गांधी यांनी घटनेची केलेली मोडतोड दुरूस्त करणे आवश्यक आहे. घटनेतील ९ वी अनुसूची संपवणे हे तर पहिले काम होते.

पण, असे काहीच घडले नाही. जमिनीच्या फेरवाटपाचा उदेउदे चालूच राहिला. ९ व्या अनुसूचीची लांबी वाढतच राहिली. सगळ्यात गंभीर गोष्ट म्हणजे खुल्या व्यवस्थेचा पुरस्कार करणारी संपादक मंडळी देखील अंगवळणी पडलेल्या सवयीने असल्या मूर्खपणाचे स्वागत करत राहिली. खुल्या व्यवस्थेत शेतीमालाची निर्यात वाढवायची असेल तर शेतजमीन व्यवस्थापन आणि तंत्रज्ञान सुधारण्यासाठी मोठ्या आकाराची करता आली पाहिजे असे डॉ. मनमोहन सिंग यांनी १९९१ सालाच्या अंदाजपत्रकी भाषणात म्हटले. त्यानंतर या विषयावर सगळीकडे प्रचंड बोलकी शांतता नांदत आहे.

सर्व संपादक मंडळींचा सूर मोठा पाहण्यासारखा आहे. जमिनीचे फेरवाटप ही महत्त्वाची गोष्ट आहे, पण राज्यात त्याविषयी फारसा उत्साह नाही. कायद्याच्या जंजाळात जमीन सुधारणा गुंतून पडली आहे. खुल्या व्यवस्थेच्या आगमनानंतर जमीन सुधारणेविषयीचा उत्साह आणखीनच कमी झाला आहे. अशी या संपादकांची तक्रार आहे.

आजपर्यंत ५० वर्षात ३०० कायदे ९ व्या अनुसूचीत घालण्यात आले. आणखी ७ कायद्यांची भर घातल्याने काय मोठा चमत्कार घडणार आहे? याविषयी कोणी बोलत नाही. जितकी काही जमीन सुधारणा अंमलात आली त्याने उत्पादकता काही वाढली नाही, हेही सर्वमान्य आहे. मग आजही जमीन सुधारणांचा आग्रह कशासाठी?

'इंडियन एक्स्प्रेस'च्या विद्वान संपादकांनी एक जावईशोध लावला आहे. खुल्या व्यवस्थेत जमीन सुधारास वाव नाही या युक्तिवादाला सडेतोड उत्तर आहे. संपत्ती अमर्यादित आहे पण जमीन अमर्यादित नाही. तात्पर्य, संपत्तीवर मर्यादा असण्याचे कारण नाही, पण जमिनीवर असली पाहिजे. पण, विद्वान संपादक-महाशय मर्यादित असलेली जमीन मालकाकडून काढून घेताना त्याला मोबदला म्हणून अमर्यादित असलेली संपत्ती देण्यात काय अडचण आहे ते सांगत नाहीत.

पण हे प्रश्न कोणी विचारणार नाही. कारण, खुल्या व्यवस्थेच्या घोषणेनंतरही देशात शेतकऱ्याला बरोबरीचा नागरिक म्हणून मानले जात नाही. त्याच्यावर उणे सबसिडीच्या रूपाने ७२% उत्पादनकर असला तरी त्याच्यावर मिळकतीचा कर नाही म्हणून टाहो फोडला जातो, आणि पोट भरण्याला देखील अपुरी असलेली जमीन त्याच्याकडून काढून घेण्यासाठी आक्राळविक्राळ कायदेकानून आणि कारवाया झाल्या तरी त्यांचा उदोउदो होतो.

पुन्हा निष्कर्ष तोच. असे का होऊ नये? शेतकऱ्यांनाच जर चीड येत नसेल तर इतरांनी त्याचा फायदा घ्यावा; कठोरपणे घ्यावा; हा खुल्या व्यवस्थेचाच धर्म आहे!

(केंद्रशासन जमिन सुधारणेसंबंधीचे सर्वच्या सर्व कायदे घटनेच्या नवव्या अनुसूचित घालण्याच्या विचारात आहे.)

●

# हिव

*आला आला गं मिरुग*
*आल्या पावसाच्या सरी*
*बाप हिंडे आनवानी*
*बियासाठी दारोदारी ।।१।।*

*झाली बियाची सांगड*
*तिफनाची दानादान*
*तिफनीच्या नळ्यासाठी*
*दिलं धोतराचं पान ।।२।।*

*बैलं आणले भाड्याचे*
*दोन दिसाचे बोलून*
*रोज खायाची जवारी*
*दिली तुक्याला तोलून ।।३।।*

*वाया गेला बाप माझा*
*खताच्या ग पोत्यापायी*
*दिलं लिहूनिया शेत*
*पोत्याच्या ग पैशापायी ।।४।।*

*झाली पेर खुरपन*
*पीक वाढे भराभर*
*शेटजीच्या पैशापायी*
*मनामध्ये झुर-झुर ।।५।।*

*तरण्याबांड पोरावाणी*
*पीक आलंया रानात*
*झाली मुदत पैशाची*
*बाप बोलतो मनात ।।६।।*

*खेळ नशीबाचा न्यारा ।*
*पाप देवाच्या पोटात ।*
*पडे हिवं शेतावरी ।*
*पिकं गेली रातोरात ।।७।*

*आला आला ग मिरुग ।*
*बापाचं ते गेलं शेत ।*
*ढग जमले आभाळी ।*
*आता पाऊस डोळ्यात ।।८।।*

**स्वामी डी. डी.**
उदगीर, जि. लातूर.

# कापसाचा एकाधिकार मोडला, राज्यबंदी मोडली त्या गावात काय चाललंय?

**— गोविंद जोशी,**
सेलू, जि. परभणी.

महाराष्ट्रात गेली दोन वर्षे शेतकरी संघटनेचे कापूस आंदोलन चालू आहे. इंग्रज भारतात आल्यापासून ते आजपर्यंत कापूस हे सर्वात जास्त गळचेपी झालेली शेतीउत्पादन,.गेली कित्येक वर्षे शेतकरी हा कापूस आंतरराष्ट्रीय किंमतीच्या चौथ्या ते सातव्या हिश्श्यात विकतो आहे.

कापसाचा आंतरराष्ट्रीय भाव गेले वर्षभर ४५०० रुपयांच्या आसपास होता. महाराष्ट्रात खुली खरेदी विक्री नाही. ९४-९५ साली शेजारच्या राज्यात कापूस नेऊन विकणाऱ्यांना २००० ते २७०० रु. रोख भाव मिळाला. त्यामुळे फेडरेशनला कापूस मिळेना. हळूहळू फेडरेशनलाही भाव वाढवत न्यावे लागले. महाराष्ट्रात कापूस फक्त फेडरेशनलाच विकता येतो (एकाधिकार). कापूस राज्याबाहेर नेता येत नाही (राज्यबंदी). कापूस निर्यातही करता येत नाही (निर्यातबंदी). कापसापासून सरकी वेगळी केल्यास वहातूक वाचते, किंमत जास्त येते. पण सरकी बाजूला करणे ही क्रिया 'प्रोसेसिंग' ठरते. याची परवानगी शेतकऱ्यांना नाही. (लायसन्स राज). कापसाचे बियाणे, धागा, कापड, तयार कपडे मात्र जगभर विकता येतात. त्यासाठी भरपूर आर्थिक सवलती मिळतात, आणि प्रोत्साहनही दिले जाते. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी हे सगळे कायदे तोडून ९२-९३ साली महाराष्ट्रातील उत्पादनाच्या ३० टक्के तर ९४-९५ मधे एकूण उत्पादनाच्या ८५ टक्के कापूस सीमापार नेऊन विकला. या चळवळीचा फायदा व्यापाऱ्यांनीही घेतला. त्यांनीही खेड्यापाड्यातून फिरून कापूस सतत फेडरेशनपेक्षा जास्त भाव देऊन रोखीने विकत घेतला. राज्याबाहेर नेऊन विकला.

एकाधिकार मोडला. राज्यबंदी तोडली. लायसन्स परमिट राज्य धुडकावून लावले. काहींनी नाके सांभाळून व्यवहार केले. काहींनी वर्दीवाल्या-बिनवर्दीवाल्या लुटारूंना कमाईतले हिस्सेही दिले. पण महाराष्ट्रात मिळेल त्यापेक्षा जास्त किंमतीला शेतकऱ्यांनी कापूस विकला.

खरा तर या वर्षी ३५०० ते ४००० भाव मिळाला असता. पण सरकारने भाव पाडण्यासाठी तीन क्लृप्त्या वापरल्या.

१. कापसाची निर्यात बंदी केली.
२. व्यापाऱ्यांच्या कापूस साठवणुकीवरची मर्यादा खाली आणली.
३. व्यापाऱ्यांना कापूस खरेदीसाठी लागणाऱ्या पैशांच्या उपलब्धतेवर बंधने आणली. (बँकेतले पैसे उचलण्याच्या संदर्भातील आदेशात बदल केले.)

त्यामुळे व्यापाऱ्यांची ३५०० ते ४००० भावाने कापूस खरेदी करण्याची तयारी असूनही प्रत्यक्ष भाव कमी राहिले. जून अखेर आंध्रात कापूस नेणाऱ्यांना ३२०० चा भाव मिळाला.

शेतकरी संघटनेच्या झेंड्याखाली झालेल्या या आंदोलनाने कापूस उत्पादनकप्रदेशात एक मोठा बदल घडून येत आहे. अजूनही एकाधिकार आहे. राज्यबंदी आहे. निर्यात बंदी आहे. एकाधिकार आणि राज्यबंदी मोडण्याचे धाडस जिथे घडले तिथे इतिहास घडत आहे. आम्ही या बदलांचा बारकाईने अभ्यास करीत आहोत. आम्हाला जाणवलेले काही बदल इथे देत आहोत. इतरत्रही बदल घडत आहेतच. पण 'कापूस नेणारे' व बाकीचे यातला हा फरक लक्ष्यवेधक आहे.

१. लुना, सायकलींची खरेदी वाढली.
२. टेपरेकॉर्डस्, कॅसेट प्लेअर, टु-इन-वन ची खरेदी वाढली. टी.व्ही. ची खरेदी वाढली.
३. कापडाचा खप वाढला. टेलरिंगमध्ये वाढ झाली.
४. सरकारी कामावरील दरापेक्षा जास्त पैसे खाजगी कामासाठी मिळत आहेत.
५. शेती, औजारे, पंप, पाईप, ड्रीप खरेदी वाढली.
६. ट्रॅक्टर खरेदी वाढली.
७. आजारी माणसांचे खर्चिक उपचार (मागे टाकलेले) होऊ लागले.
८. शहरातील दवाखान्यात खेड्यातील वृद्ध, मुली यांना तपासणासाठी, उपचारासाठी

येण्याचे प्रमाण वाढले.
९. स्पेशालिस्ट डॉक्टर्सच्या खेड्यांना भेटी वाढल्या.
१०. नवे स्पेशालिस्ट दवाखाने खेड्यात सुरू होण्याचे प्रमाण वाढले.
११. लोक डॉक्टर बदलून एम.बी.बी.एस. कडे जाण्याचे प्रमाण वाढले.
१२. वेल्डिंगची दुकाने वाढली.
१३. खेड्यातील बांधकामांचे प्रमाण वाढले.
१४. घरांची दुरूस्ती वाढली.
१५. जागेच्या किंमती वाढल्या.
१६. शेतीचे गावठाणात रूपांतराच्या मागण्या वाढल्या.
१७. 'उत्सव' वाढले. (कुठल्याही निमित्ताने)
१८. लग्नात लायटिंग, बुंदी आणि आहेर वाढले.
१९. भाड्याच्या जिप्स-ट्रक-ट्रॅक्टर्सचा वापर वाढला.
२०. एस्.टी. भाड्याने घेणे वाढले. (लग्नकार्य-प्रवासासाठी)
२१. जेवणात भाज्या, मटण, अंडे वाढले.
२२. न्याहऱ्या बदलल्या.
२३. मुलांचा खाऊ – शेव चिवड्याऐवजी कलाकंद, पेढे आणि आंबे.
२४. हातगाड्यावर नव्यात नव्या सिनेमाच्या कॅसेट विकणारे बाजाराच्या गावापर्यंत आले.
२५. टपऱ्यावर लोक साध्याऐवजी कलकत्ता पान खाऊ लागले.
२६. विड्यांऐवजी सिगरेटची विक्री वाढली.
२७. घरात गुळाऐवजी साखर वाढली.
२८. खेड्यात भाजीपाल्याला ग्राहक मिळू लागलाय.
२९. शहरातून आंबे बाजाराच्या गावी चालले.
३०. हॉटेल टपऱ्या वाढल्या.
३१. तीर्थयात्रा वाढल्या.
३२. खाजगी गाड्या (वाहतुकीसाठी) वाढल्या.
३३. पडिक जमिनी पेराखाली आणण्याचे प्रमाण वाढले.
३४. दागिने मोडण्याचे प्रमाण फार कमी झाले.
३५. दागिन्यांची आपसात खरेदी वाढली.
३६. बियाणांच्या किंमतीबद्दल खळखळ नाही. पाहिजे असलेल्या बियाणांसाठी असेल ती किंमत द्यायची तयारी. बियाणांची खरेदी रोखीने होण्याचे प्रमाण अधिक.
३७. शेती औजारे, पंप, पाईप, ड्रीप खरेदी वाढली.
३८. पूर्वी पीककर्ज घेतल्याशिवाय पेरण्या व्हायच्या नाहीत. पीक कसं येतंय ते बघून कर्ज घेऊ म्हणणारे वाढले.
३९. खताचा खप वाढला.
४०. खतासाठी लोक रोख पैसे भरून आपल्याला अमुक तारखेला इतके खत पाहिजे अशी आगाऊ खरेदी करू लागलेत.
४१. 'बेबाक' लोकांचे प्रमाण वाढले. बँकांचे अधिकारी त्यांना आता पतदार गिऱ्हाईक म्हणून वागणूक देतात. (बँकेच्या वागणुकी बदलताहेत.)
४२. लोक सहकारी पतसंस्था, सहकारी बँका यांची खाती बंद करून शेड्युल बँकेत खाते नेताहेत.
४३. उशिरापर्यंत कापूस ठेवला. तरीही २०-२५ दिवसात जमिनी पुन्हा पेरणीसाठी तयार केल्या.
४४. उशिरापर्यंत घरी ज्वारी ठेवली. भावासाठी थांबण्याचे प्रमाण वाढले.
४५. ज्वारीचे क्षेत्र कमी करून कापूस वाढवला. ऊसाऐवजी बागायती कापूस वाढला.
४६. सहकारी / खाजगी जिनींगवाले गडबडून गेलेत. त्यांना कापूसच मिळेना. त्यांनी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांकडे एकाधिकार कायद्याच्या कठोर अंमलबजावणीचा आग्रह धरला.
४७. भावात फरक खूप असल्याने ट्रकमागे वर्दीतल्या लुटारूंनी ५ ते ७ हजार रुपयांची लूट केली. व्यापाऱ्यांनी, शेतकऱ्यांनीही ती दिली. कोणत्याही ट्रक रॅलीला मात्र लुटारूंचा त्रास झाला नाही.
४८. शेतकरी संघटनेचे अनुकरण इतरही संघटनांनी केले. परभणी, नांदेड जिल्ह्यात शिवसैनिकांनीही रॅलीज नेल्या.
४९. रॅलीचा खर्च म्हणून आयोजकांनी हजार रुपये ट्रक प्रमाणे वर्गणी घेतली. शेतकऱ्यांनी ती आनंदाने दिली.
५०. शेतकरी व्यापारात उतरले. घरचा मालच नव्हे तर गावातील इतरांचा मालही खरेदी करून बाहेर नेऊन विकू लागले. बाहेरील वस्तू गावात आणून विकू लागले.

●

**मुक्त अर्थव्यवस्था येत आहे, तिला कोणीही थांबवू शकणार नाही.**

# दारिद्र्य निर्मूलनाच्या नावाखाली आणखी लुटीचे कारस्थान?

दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमासाठी केंद्र सरकारने ३० हजार कोटी रुपयांची तरतूद केली असून पुढील पंचवार्षिक योजनेत ही रक्कम दुप्पट करण्यात येणार असल्याचे पंतप्रधान श्री. नरसिंह राव यांनी कलकत्ता येथे १५ सप्टेंबर ९५ रोजी जाहिर केले. दारिद्र्य निर्मूलनाचा हा राष्ट्रीय कार्यक्रम काँग्रेस कार्यकर्त्यांनी बिगर शासकीय संघटनांच्या माध्यमातून गावपातळीवर पोहोचविण्याची आवश्यकता त्यांनी यावेळी प्रतिपादित केली. ते म्हणाले, 'कार्यक्रमात त्रुटी असणे शक्य आहे. पण 'दरिद्री नारायण' परिस्थितीच्या सुधारणेवरच देशाचा विकास अवलंबून आहे.' विविध स्तरांतील नागरिकांना सरकारच्या विकास कार्यक्रमांचा लाभ घेता यावा यासाठी वेगवेगळ्या धर्तीचे अनेक कार्यक्रम राबविले जात आहे असेही ते म्हणाले.

*(लोकसत्ता, १६/९/९५ वरून)*

पंतप्रधानांनी ही घोषणा त्यांच्या पक्षाच्या कलकत्ता येथील 'विधानभवन' या प्रस्तावित कार्यालयाच्या पायाभरणी समारंभात केली.

**प्रश्न असे उभे राहातात –**

१. सरकारी कार्यक्रम पक्षाच्या कार्यक्रमात का घोषित करावा?

२. कार्यक्रम बिगरशासकीय माध्यमांद्वारे राबविण्याची कल्पना ठीक आहे. पण तो काँग्रेस कार्यकर्त्यांनीच का राबवावा?

**आणि मुळातील प्रश्न**

३. 'दरिद्री नारायणा'चा जनक कोण?

४. तीस हजार कोटी कुठून आणणार? आज भांडवल निर्मितीची क्षमता शेतीतच शिल्लक असेल तर या तीस हजारासाठी आधीच दरसाल चोवीस हजार कोटींनी लुटल्या जाणाऱ्या शेतीला आणखी लुटावे लागणार. मग 'दरिद्री नारायण'चा विकास होणार की तो अधिक भकास होणार?

**अखेरी**

५. नेहरूनीतीने 'दरिद्री नारायण' घडवला, इंदिरा गांधींनी दारिद्र्य निर्मूलनाचे कार्यक्रम सुरू करून 'दरिद्री नारायण' वाढवला, राजीवजींनी 'नागवला' आणि आता राव साहेब या दरिद्री नारायणाचे मढे पाडून त्याच्या टाळूवरचे लोणी खाण्याची सूचना तर आपल्या टोळकऱ्यांना सुचवत नाहीत ना?

**बाबुभाई जैन,**
अलिबाग.

# शेतकरी संघटना जिल्हाप्रमुख

शेतकरी संघटनेचे अध्यक्ष श्री. शंकर धोंडगे व शेतकरी महिला आघाडीच्या अध्यक्षा सौ. इंदिराबाई पाटील यांनी महाराष्ट्रभर केलेल्या दौऱ्यात केलेल्या आवाहनानुसार पुढील कार्यकर्त्यांनी एक वर्ष जिल्हा प्रमुख म्हणून काम करण्याचे स्वेच्छेने स्वीकारले आहे :

| **जिल्हा** | **जिल्हाप्रमुख** |
|---|---|
| १) नांदेड | श्री. गुणवंत पा. हंगरगेकर |
| २) लातूर | श्री. राजकुमार मजगे |
| ३) बीड | श्री. नारायण पांडे |
| ४) उस्मानाबाद | ॲड. नेताजी गरड |
| ५) परभणी | श्री. उत्तमराव बावळे |
| ६) औरंगाबाद | श्री. यासीनभाई गणोरकर |
| ७) जालना | श्री. लक्ष्मण वडले |
| ८) सोलापूर | श्री. शिवानंद दरेकर |
| ९) सांगली | श्री. सदाशिव रामचंद्र खोत |
| १०) कोल्हापूर | श्री. भगवान काटे |
| ११) अहमदनगर | श्री. अनिल घनवट |
| १२) नाशिक | श्री. मोहन गुंजाळ |
| १३) धुळे | श्री. रमाकांत देसले |
| १४) जळगाव | श्री. चिमणराव पाटील |
| १५) बुलढाणा | श्री. वामनराव जाधव |
| १६) अकोला | श्री. मनोज तायडे |
| १७) अमरावती | श्री. श्रीकांत पाटील पुजदेकर |
| १८) वर्धा | श्री. पांडुरंग भालशंकर |
| १९) नागपूर | श्री. मदन कामडे |
| २०) भंडारा | श्री. चौधरी गुरुजी |
| २१) गडचिरोली | ॲड. सी. डब्ल्यू मुनघाटे |
| २२) चंद्रपूर | श्री. अशोक मुसळे |
| २३) यवतमाळ | श्री. मारोतराव काळे |

या सर्व जिल्हाप्रमुखांचे पहिले प्रशिक्षण शिबीर आंबेठाण येथील कृषि अर्थप्रबोधिनीमध्ये २ ते ११ ऑक्टोबर १९९५ या दिवसांत होणार आहे.

# कृषि अर्थ प्रबोधिनी प्रशिक्षण शिबिरे

खुल्या अर्थव्यवस्थेला केंद्रस्थानी ठेवून तयार करण्यात आलेल्या नव्या अभ्यासक्रमाची प्रशिक्षण शिबिरे २ ऑक्टोबर १९९५ पासून सुरू होत आहेत.

२ ऑक्टोबरला सुरू होणारे पहिले प्रशिक्षण शिबीर सर्व जिल्हा प्रमुख व काही प्रमुख कार्यकर्त्यांसाठीच असेल.

दुसरे शिबीर २१ ऑक्टोबर ते ३० ऑक्टोबर व त्यानंतर दर महिन्यात ६ ते १५ व २१ ते ३० या कालावधीची दोन शिबिरे होतील.

शिबिरासंबंधी पहिले प्रकटन शेतकरी संघटकमधून प्रकाशित केल्यानंतर अनेक कार्यकर्त्यांची शिबिरात सहभागी होण्याचा मनोदय व्यक्त करणारी पत्रे कृषि अर्थ प्रबोधिनीकडे आली आहेत. शिबिरात निवड करण्याच्या दृष्टीने या पत्रांतील माहिती पुरेशी नाही. तरी शिबिरात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या कार्यकर्त्यांनी आपली माहिती पुढील स्वरूपात पाठवावी.

महत्त्वाचे म्हणजे या शिबिराचा अभ्यासक्रम पाहाता त्यासाठी वेगवेगळी साधने वापरावी लागतील, काही अभ्यासटिपणे प्रशिक्षणार्थींना पुरवावी लागतील, प्रशिक्षकांना / तज्ज्ञांना मानधन, प्रवासखर्च देणे खुल्या व्यवस्थेच्या तत्त्वज्ञानानुसार अपरिहार्य होणार आहे, शिवाय, दहा दिवसाच्या व्यवस्थेचा खर्च आहेच. त्यामुळे, ही शिबिरे कृषि अर्थ प्रबोधिनीला बरीच खर्चिक होणार आहेत. त्यामुळे, प्रशिक्षणार्थींनी या खर्चाचा आंशिक भार उचलावा अशीही अपेक्षा आहे. त्यामुळे या शिबिरासाठी प्रत्येक प्रशिक्षणार्थीला रु. २५०/- शिबीर शुल्क आकारण्याचे सध्या ठरले आहे.

**कृषि अर्थ प्रबोधिनी,**
**अंगारमळा, आंबेठाण, ता. खेड, जि. पुणे.**

## प्रशिक्षणार्थी नोंदणी आवेदन

१. नाव : ____________________

२. संपूर्ण पत्ता : ____________________

____________________ फोन नं. : __________

३. शेतकरी संघटनेतील पद (असल्यास) ____________________

४. शिक्षण : __________ ५. वय : __________ वर्षे

६. व्यवसाय : __________ ७. व्यवसायातील अनुभव : __________ वर्षे

__________ __________ वर्षे

__________ __________ वर्षे

__________ वर्षे

८. कौटुंबिक जबाबदारी : (अ) उत्पन्न (अंदाजे)
(क) अवलंबून असणारांची संख्या
(ब) विवाहित / अविवाहित

९. शेतकरी संघटनेतील सहभाग : स्वरूप ____________________

कालावधी ____________________

१०. पूर्वी प्रशिक्षण झाले आहे का? होय / नाही.

११. असल्यास, कधी? __________ ते __________

१२. प्रशिक्षण पूर्ण केल्यावर काम करण्याची तयारी
(अ) स्वरूप : ____________________
(ब) कालावधी : ____________________
(क) क्षेत्र : ____________________

१३. वाहन चालवता येते काय? : सायकल / मोटार सायकल / मोटार

१४.

| भाषा | मराठी | हिंदी | इंग्रजी | इतर |
|---|---|---|---|---|
| बोलणे | | | | |
| वाचणे | | | | |
| लिहिणे | | | | |

१५. शिबिरासाठी सोयीस्कर कालावधी : __________ ते __________

**शिबिरात निवड झाल्यास**

**१) शिबिरातील खर्चाचा भार भरण्यास तयार आहे.**

**२) निवड झालेल्या वेळात संपूर्ण काळ शिबिरात हजर राहाण्यास तयार आहे.**

सही

# धीट महिला सरपंच, गुंड पुढारी, नाकर्ते प्रशासन आणि थंड जनता

आपल्या हातातील बाहुले होण्यास तयार नसलेल्या सरपंच महिलेवरील बहिष्कार अधिकाऱ्यांच्या मध्यस्थीनंतरही मागे घेण्यास पुढारी मंडळी तयार नसल्याने राजकारणात या महिलेची अधिकाधिक कोंडी होऊ लागली आहे. तिने राजीनामा द्यावा, यासाठी हरप्रकारची दडपणे तिच्यावर आणली जात असून, कॉलेजमध्ये जाणाऱ्या तिच्या मुलीलाही वाटेत अडवून धाकदपटशा दाखवला जात आहे. या महिलेने पोलिस संरक्षण मागितले असताना तिला त्याचा खर्च द्यावा लागेल, असे सांगण्यात आले. त्यामुळे प्रकरण राजकीय व सामाजिकदृष्ट्या आणखी गुंतागुंतीचे होत जाणार, अशी चिन्हे दिसत आहे. राजीनामा न देण्याचा या महिलेला निर्धार ही या सर्व प्रकरणातील रूपेरी कडा म्हणता येईल.

आंबेगाव तालुक्याची 'तहसील कचेरी' ज्या घोडेगाव येथे आहे, तेथून अवघ्या २ किलोमीटर अंतरावरील धोंडमाळ शिंदेवाडी या ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाच्या निवडणुकीतून हे वादळ निर्माण झाले. सधन बागायतदारांचे हे गाव असल्याने ठराविक तथाकथित पुढाऱ्यांची तेथे दहशत आहे. त्यामुळे त्यांनी हुकूम करावयाचा व गावकऱ्यांनी तो मुकाट पाळावयाचा ही तेथील आजपर्यंत प्रथा आहे.

पुण्यातील अल्पबचत भवन येथे पाच ऑगस्ट रोजी ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाच्या सोडतीचा जो कार्यक्रम झाला, त्या वेळी या धोंडमाळ-शिंदेवाडी ग्रामपंचायतीचे सरपंचपद 'सर्वसाधारण' प्रकारात आले. दरम्यान, २४ ऑगस्ट रोजी येथील पंचायत समिती सदस्या श्रीमती वत्सलाबाई काळे यांनी आपल्या सरपंचपदाच्या उमेदवारीचा अर्ज निवडणूक अधिकाऱ्यांकडे दिला. "ही जागा सर्वसाधारण" असतानाही महिला अर्ज करण्याचे धाडस करतेच कशी? अशी प्रतिक्रिया पुरुष पुढाऱ्यांमध्ये होती. हे पद महिलांसाठी राखीव नाही. त्यामुळे तुम्ही अर्ज मागे घ्या, असे त्यांनी श्रीमती काळे यांना सांगितले. हे पद महिलांसाठी राखीव नसल्याने तुमचा अर्ज बादच होणार, असा युक्तिवादही त्यांनी करून पाहिला. पण त्या कोणत्याही दबावाला व धाकदपटशांना त्या बधल्या नाहीत. त्यामुळे निवडणुकीत सात सदस्यांपैकी चार सदस्यांची मते मिळवून त्या विजयी झाल्या. निवडणूक अधिकाऱ्यांनी त्यांच्या विजयाची घोषणा करताच पुढारी मंडळींचे पित्त खवळले. त्याच दिवशी गावातील मुख्य दैवत असलेल्या मारुती मंदिरात बैठक होऊन बहिष्काराचे पाऊल उचलण्यात आले. या बैठकीत या निवडीबद्दल भरपूर टिंगलटवाळी करण्यात आली.

सरपंचपदी महिला आल्याने गावचा विकासच होणार नाही, शासकीय कामापासून आपले गाव वंचित ठेवले जाईल, या महिलेला शासकीय कार्यालय तरी माहीत आहे का, शासकीय बैठकीत गावची बाजू कशी मांडायची हे तरी तिला उमगणार का, अशा शंका-कुशंका उपस्थित करण्यात आल्या.

"हे लक्षात घेऊन या महिलेने सरपंचपदाचा राजीनाम द्यावा, अन्यथा तो सादर केला जाईपर्यंत तिच्यावर व तिच्या कुटुंबावर बहिष्कार टाकला जाईल." असे जाहिर केले गेले.

या सरपंच महिलेच्या शेतात कोणी कामास जाऊ नये, कोणीही तिच्याशी संभाषण करू नये. अशी सक्ती तिच्यावर करण्यात आली. याचे पालन न करणाऱ्यांकडून २५१ रुपये दंड वसूल केला जाईल, अशीही तंबी देण्यात आली. हा निर्णय तातडीने अमलात आला.

या निर्णयामुळे श्रीमती काळे यांच्या शेतातील सव्वादोन एकर भुईमूग, अर्धा एकर वाटाणा, दीड एकर टोमॅटो तोडीवाचून पडून

महिलांसाठी पंचायत राज्यात ३० टक्के राखीव जागा देण्याचे शासनाचे धोरण आजपर्यंत सत्तेला सोकावलेल्या पुढाऱ्यांनी अत्यंत नाखुशीने स्वीकारले असल्याचे प्रत्यंतर वेगवेगळ्या ठिकाणी घडणाऱ्या घटनांवरून दिसून येत आहे. शेतकरी संघटकच्या ६ ऑगस्ट ९५ च्या अंकात राजस्थान मधील दोन गावांतील पुढाऱ्यांनी स्त्रियांच्या निवडीला केलेला विरोध व केलेल्या सोयीस्कर तडजोडी यासंबंधी दोन घटना प्रकाशित केल्या होत्या. महाराष्ट्रातही तसेच घडते आहे. आपल्याकडील अशा घटनांची माहिती कळविण्याचे आवाहन संघटकने केले होते. पण एक निनावी कार्ड, ज्यामध्ये 'संघटनेचे कार्यकर्तेही याच मनोभूमिकेत आहेत' असा आशय आहे. येण्यापलिकडे काही या आवाहनाला प्रतिसाद मिळाला नाही. या आरक्षणाबद्दल पुरुष पुढाऱ्यांची नाखुशी जबरदस्त कडवी आहे आणि इतरांची भूमिका भित्र्या तटस्थतेची आहे.

याचा अर्थ स्पष्ट आहे. इथे असेच एक वृत्त पुनर्मुद्रित करीत आहे. या वृत्तातील वत्सलाबाईने जरा आगळीकच केली आहे. शासनाने आखून दिलेल्या ३० टक्क्याच्या लक्ष्मण रेषेबाहेर तिने पाऊल टाकले आणि गावातील सर्व 'रावण' चवताळले. वत्सलाबाई आणि तिचे कुटुंबीय यांचे धारिष्ट्य व निग्रह, गावपुढाऱ्यांचा पुरुषी अहंकार व पुंडाई, प्रशासन यंत्रणेचा नाकर्तेपणा आणि ज्या गावकऱ्यांना वत्सलाबाई सरपंच झाल्याचा मनोमन आनंद झाला आहे त्यांचा भित्रा अजागळपणा यांचे संमिश्र दर्शन देणारा हा प्रसंग इथे ज्यावेळी घडू लागला त्यावेळी साऱ्या जगातील स्त्री-कार्यकर्त्या बेजिंग येथे एकत्र बसून स्त्रियांच्या न्याय्य हक्कांवर चर्चा करीत होत्या.

प्रकरण चिघळू नये, तडजोड व्हावी म्हणून सरकारी अधिकाऱ्यांनी पुढारी व सरपंच वत्सलाबाई यांची इतर काही गावकऱ्यांसमवेत बैठक बोलावली असता तेथे पुढाऱ्यांनी अधिकाऱ्यांच्या निषेधाच्या घोषणा देऊन वत्सलाबाई आणि कार्यकर्त्यांना दमदाटी केली. वत्सलाबाईंनी संरक्षणाची मागणी केली असता फौजदारांनी 'प्रत्येक पोलिसामागे दर दिवशी येणारा सुमारे सत्तर रुपये खर्च द्यावा लागेल' असे सुनावले.

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On 21st September, 1995

To

SHETKARI SANGHATAK
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
September 21, 1995

PNCW 281
Licence to post without prepayment
No. 87

आहे. त्याच्या नुकसानीची इतर कोणालाही फिकीर वाटत नाही. शेतीच्या कामासाठी इतर गावांहून मजूर आणले असताना त्यांना दमदाटी करण्यात येत आहे. त्यामुळे कोणीच शेतावर येण्यास धजत नाही.

या सर्व दबावतंत्रामुळे या कुटुंबावर प्रचंड मानसिक ताण आला आहे. तहसीलदार आणि इतर अधिकाऱ्यांनी शुक्रवारी तहसीलदार कार्यालयात बैठक घेतली. "लोकशाही मार्गाने निवडून आलेल्या श्रीमती काळे यांना सहकार्य करावे." असे आवाहन त्यात करण्यात आले. पण आमचा बहिष्कार नसून असहकार आहे, अशी मखलाशी पुढाऱ्यांनी केली आणि या महिलेला पाठीशी घातल्याबद्दल अधिकाऱ्यांच्या निषेधाच्या घोषणा देत ते सभेतून बाहेरही पडले.

बैठकीला सरपंच श्रीमती काळे, स्त्रीआधार केंद्राच्या सीताबाई काळे, तहसीलदार अर्जुनराव खरात, गटविकास अधिकारी जगन्नाथ पवार, फौजदार ए. ए. जगदाळे आदी हजर होते. हा वाद तूर्त थांबवा, अशी विनंती पुढाऱ्यांना अधिकाऱ्यानी केली. पुढरी मंडळी मात्र आपला हेका सोडत नव्हती. त्यांचे म्हणणे "आम्ही कोणाशी बोलायचे, कोणाशी बोलायचे नाही, हे आम्ही ठरवणार. गावातील तंटे गावातच मिटले पाहिजेत ही आमची भूमिका आहे. आम्हाला श्रीमती काळे यांचा सरपंचपदाचा राजीनामा तर हवाच पण सदस्यपदाचाही राजीनामा हवा."

या बैठकीत कोणतीच तडतोड न झाल्याने या प्रश्नाने अधिक गंभीर स्वरूप धारण केले आहे.

श्रीमती काळे या सामूहिक दडपणामुळे काहीशा अस्वस्थ झाल्या आहेत. सातवीपर्यंत शिकलेल्या या सरपंच महिलेची गावासाठी काम करण्याची अगदी मनापासून इच्छा आहे, असे त्यांची भेट घेतल्यावर आढळून आले. त्या म्हणाल्या, "मी सरपंच म्हणून निवडून येईन, यांची पुढारी मंडळींना कल्पना नव्हती. त्यामुळे या निवडीने त्यांना घामच फुटला. म्हणून त्यांनी बहिष्काराचे पाऊल उचलले. पण मी व माझे कुटुंबीय अशा धमक्यांना बिलकूल भीक घालणार नाही. राजीनामा देण्याचा माझा बिलकूल विचार नाही."

"आपल्या निवडीबद्दल गावकरीवर्गात समाधान असले तरी सामूहिक बहिष्काराचे आव्हान धुडकावून लावण्याचे साहस एकाही गावकऱ्याने का दाखवू नये," अशी खंतही त्यांनी बोलून दाखविली.

श्रीमती काळे यांची मुलगी घोडेगाव महाविद्यालयात शिकत असून तिलाही तिच्या आईबरोबर त्रास दिला जात आहे. महाविद्यालयातून तो घरी जात असताना सुरेश दत्तू काळे या तरुणाने तिच्या अंगावर सायकल घालून शिवीगाळ केल्याची तक्रार घोडेगाव पोलिसठाण्यात दाखल झाली आहे. मुलीने स्वतः हा प्रकार घोडेगाव पोलिस ठाण्यात फौजदार जगदाळे यांना सांगितला.

श्री. काळे याला बोलावून घेऊन या मुलीची माफी मागावयास लावले. तथापि, पोलिस या प्रकरणात विशेष लक्ष देत नसल्याने श्रीमती काळे यांनी स्त्रीआधार केंद्रावर धाव घेतली आहे. ●

## वाढदिवस शुभेच्छा – जाहिर आभार

**स. न. वि. वि.**

*महाराष्ट्रातील असंख्य शेतकरी भावाबहिणींनी आणि माझ्या इतर हितचिंतकांनी तारा, पत्र, शुभेच्छा कार्ड, फोनद्वारे माझ्या वाढदिवसानिमित्त आपुलकीने शुभेच्छा पाठवल्या. प्रत्येकाला व्यक्तिशः पोहोच देऊन त्यांच्या भावनेचा आदर करावा म्हणून आभार पत्रे लिहायला सुरुवात केली. पण दोनच दिवसांत कळून चुकले की इतक्या सर्व पत्रांना उचित कालावधीत पोहोच देणे केवळ अशक्य आहे. म्हणून तो बेत रद्द करून ही जाहिर पोहोच देत आहे.*

*माझा वाढदिवसानिमित्त वेगवेगळ्या मार्गांनी मला निखळ, निर्व्याज प्रेमभावनेने शुभेच्छा देणाऱ्या माझ्या सर्व शेतकरी भावाबहिणींचा व हितचिंतकांचा मी सदैव ऋणी आहे. पुढेही आपणा सर्वांच्या प्रेमास पात्र राहाण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करीन.*

*१० सप्टेंबर १९९५*

*आपला,*

**शरद जोशी**

६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.
प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता
अंगारमळा, मु. पो. आंबेठाण (४१० ५०१)
ता. खेड, जि. पुणे.

संपादक, मुद्रक, प्रकाशक
सुरेशचंद्र म्हात्रे
फोन : द्वारा - चाकण ५२३५४/५२४६८
एस्.टी.डी. - ०२१३५

पाक्षिक शेतकरी संघटक
मालक — मोहन बिहारीलाल परदेशी
मुद्रण स्थळ — गणेश प्रिंटर्स,
६९३, बुधवार पेठ, पुणे - २.